cmyk



दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

गणपती बाप्पा मोरया

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१३७ | शनिवार दि.०७ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी पहिला सौरऊर्जा प्रकल्प सुरु

## धोंदलगाव सौर ऊर्जा प्रकल्पातून परिसरातील १७५३ शेतकऱ्यांना होणार फायदा

**छ.संभाजीनगर। प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित व भरवशाचा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत राज्यात ९२०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत असून त्यापैकी ३ मेगावॅट क्षमतेचा पहिला सौरऊर्जा प्रकल्प छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील धोंदलगाव येथे कार्यान्वित करण्यात झाला. या प्रकल्पामुळे १७५३ शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे.**

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने शेतकऱ्यांसाठी ही योजना राबविण्यात येत आहे. हा जगातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प आहे. धोंदलगाव प्रकल्प ही सुरुवात आहे. या वर्षी मार्चमध्ये प्रदान केलेल्या ९२०० मेगावॅट विकेंद्रित सौर प्रकल्पांचा हा एक भाग आहे. प्रकल्पांतर्गत संपूर्ण क्षमता डिसेंबर २०२५ पर्यंत टप्प्याटप्प्याने कार्यान्वित केली जाणार आहे, असे महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले. धोंदलगाव येथे महावितरणच्या उपकेंद्रापासून सुमारे साडेतीन किलोमीटर अंतरावर असलेल्या १३ एकर शासकीय जमिनीवर हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या कामासाठी महावितरणकडून संबंधित

◀◀ पान २ वर



### राज्यात विविध ठिकाणी उभारणार निर्मिती केंद्रे

सौर ऊर्जेचा वापर करून वीज निर्माण करायची व त्याच्या आधारे कृषी पंप चालवायचे अशी ही योजना आहे. त्यासाठी राज्यात विविध ठिकाणी विकेंद्रित स्वरुपात सौर ऊर्जा निर्मिती केंद्रे उभारण्यात येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा होण्यासोबत स्वस्तात वीज उपलब्ध झाल्याने उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी करण्याची संधी भविष्यात मिळणार आहे. या योजनेमुळे कृषी क्षेत्राला मोलाची मदत करण्यासोबतच उद्योगांनाही प्रोत्साहन मिळणार आहे.

# धनंजय मुंडेंच्या नाथ प्रतिष्ठानच्या गणेश महोत्सवाला आजपासून सुरूवात


## अभिनेत्री रश्मीका मंदाना , क्रिती सनॉन यांची उपस्थिती

### कैलाश खेर, अभिलिप्सा पांडा, हेमा मालिनी, अजय-अतुल, आनंद शिंदे यांसह हिंदी-मराठी सिनेसृष्टीतील कलाकारांच्या उपस्थितीत परळीवासीयांसाठी दहा दिवसांची सांस्कृतिक मेजवानी

**परळी वै.। प्रतिनिधी**

**राज्याचे कृषिमंत्री, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष धनंजय मुंडे यांच्या नाथ प्रतिष्ठानच्या मार्फत दरवर्षी साजरा केला जाणारा व महाराष्ट्रभर ख्याती असलेला श्री वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सव यावर्षी १९ व्या वर्षात पदार्पण करत असून यावर्षी देखील श्री गणेश महोत्सवाचे परळी शहरात आजपासून दिमाखदार आयोजन करण्यात येत आहे.**

आज श्री गणेश चतुर्थीच्या दिवशी ना.धनंजय मुंडे यांच्या हस्ते शुभमुहूर्तावर श्रींची स्व.पंडित अण्णा मुंडे सहभागृह, जत्रा मैदान, परळी येथे विधिवत स्थापना करून या गणेश महोत्सवास सुरुवात होईल. या गणेश महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमास नॅशनल क्रश म्हणून ओळख असलेली पुष्पा फेम अभिनेत्री रश्मिका मंदाना तसेच रामायण चित्रपटातुन देशाच्या घराघरात पोहोचलेली सीतेचा अभिनय अत्यंत उत्कृष्टरित्या केलेली अभिनेत्री क्रिती सनोन या दोघींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तर ता उदघाटन कार्यक्रमाचे निवेदन अभिनेता संकर्षण कऱ्हाडे करणार आहे. यावर्षीच्या गणेश महोत्सवात प्रतिवर्षी पेक्षाही उत्तम दर्जाच्या कलाकारांच्या उपस्थितीत परळी वासियांना सांस्कृतिक कार्यक्रमांची मोठी मेजवानी गणेशोत्सवाचे १० ही दिवस अनुभवायला मिळणार आहे. असे आहेत कार्यक्रम पहिल्या दिवशी सात सप्टेंबर शनिवारी अभिनेता संकर्षण कराडे त्याचबरोबर सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, तेजा देवकर, ऋतुजा जुन्नरकर, पूनम कुडाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम तर दुसऱ्या दिवशी ८ तारखेला रविवारी सायंकाळी प्रसिद्ध गायक कैलाश खेर व गायिका अभिलिप्सा पांडा यांच्या शिव भजन गीतांचा कार्यक्रम होईल.



◀◀ पान २ वर

# फडणवीसांचा आ.राऊतांच्या माध्यमातून मराठ्यांमध्ये फुट पाडण्याचा प्रयत्न-मनोज जरांगे पाटील

## तेलगाव येथे आयोजित घोंगडी बैठकीत सरकारला इशारा

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आ.राजेंद्र राऊतांच्या माध्यमातुन मराठ्यांमध्ये फुट पाडण्याची खेळी करत आहेत. असा आरोप मराठा यौध्दे मनोज जरांगे पाटील यांनी करत त्यांची ही खेळी महाराष्ट्रातील मराठे यशस्वी होऊ देणार नाहीत. असा इशाराही पाटील यांनी देत सरकार आम्हा मराठा समाजास आरक्षण दिले तर आम्ही राजकारण करणार नाही.पण जर आरक्षण दिले नाही तर आम्हाला विचार करावा लागेल.असा इशारा सरकारला मनोज जरांगे पाटील यांनी तेलगाव येथे आयोजित घोंगडी बैठकीत बोलताना

◀◀ पान २ वर



# केजमध्ये चोरटे पकडले ग्रामस्थांची बेदम मारहाण

**केज। प्रतिनिधी**

**तालुक्यातील कानडी, कासारी, धर्माळा, साबला परिसरात चोरट्यांना रात्री ग्रामस्थांनी बेदम मारहाण करत रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास पकडले.**

केज तालुक्यातील कानडी परिसरात रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास ड्रोनच्या सहायाने चोरी करण्याच्या उद्देशाने एका काळ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी फेऱ्या मारत असल्याचे ग्रामस्थांच्या लक्षात आले. त्यानुसार त्यांनी त्यांना हटकले असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे देण्यास सुरूवात केली. यावेळी ग्रामस्थांना त्यांना पकडले.त्यानंतर ग्रामस्थांनी चांगलाच चोप दिल्यानंतर हात पाय बांधून

◀◀ पान २ वर

# आपत्ती व्यवस्थापनाबाबत सर्वांनी दक्ष रहावे-दिलीप गावडे

**छ.संभाजीनगर। प्रतिनिधी**

नैसर्गिक आपत्तीच्या कालावधीत परिस्थितीचा सामना करण्यासाठी आपापसात योग्य समन्वय, संपर्क, संवाद महत्त्वाचा आहे तसेच आपत्ती व्यवस्थापनाबाबत सर्वांनी दक्ष राहावे, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज केले. आपत्ती व्यवस्थापनात स्थानिक नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील ऑडिटोरियम हॉल येथे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या वतीने आयोजित 'दक्ष' आपत्ती व्यवस्थापन

◀◀ पान २ वर

# राज्यात ५२.४६ टक्के गुंतवणूक - फडणवीस

मुंबईः देशातील एकूण परकीय गुंतवणूकीची एप्रिल ते जून २०२४ या पहिल्या तिमाहीची आकडेवारी समोर आली असून, देशात झालेल्या एकूण गुंतवणुकीपैकी तब्बल ५२.४६ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली असून राज्याने परकीय गुंतवणुकीत आपले अव्वल स्थान कायम राखले असल्याची माहिती, उपमुख्यमंत्री देवेंद्र

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०४ सप्टेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १२.५० क्विंटल | २,६१० | ३,२८० | २,८११ |
| ज्वारी/हायब्रिड :१२३.०० क्विंटल | २,००० | ३,००१ | २,२७० |
| मूग : १११.०० क्विंटल | ५,९०० | ८,२७५ | ७,५७९ |
| तूर : १.०० क्विंटल | ८,५०० | ८,५०० | ८,५०० |
| उडीद : ५६.५० क्विंटल | ७,००१ | ८,००० | ७,५७९ |
| बाजरी:२६.५० क्विंटल | २,००० | २,७०१ | २,४४८ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १९४.५० क्विंटल | ४,५५० | ४,६२५ | ४,५७७ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,७०० | ७,२०० | ६,७०० |




cmyk

## अग्रलेख

# बुलडोझर संस्कृतीला चाप!

झटपट न्याय ही बॉलिवूडपटांची हक्काची व आवडती संकल्पना! अनेक मसाला चित्रपटांनी कथानकाचा हा फॉर्म्युला वापरून आपले गल्ले भरले. पडद्यावर असा झटपट न्याय होत असताना चित्रपटगृह टाळ्यांनी आणि शिट्ट्यांनी दणाणून उठत असले तरी हा सगळा प्रकार काही घटकांच्या मनोरंजनासाठीचा आभासी खेळच! वास्तविक जीवनात कायद्याचे राज्य असते व न्याय कायदेशीर पद्धतीनेच व्हायला हवा. मात्र, हल्ली आभासी जग व वास्तव यातील फरकच आपण विसरून चाललो आहोत का? अशी शंका यावी असेच वातावरण आहे. नामचिन गुंडाला जमावाने मरेपर्यंत मारल्यावर वा सुरक्षा यंत्रणांनी अशा गुंडाचा खात्मा केल्यावर समाज म्हणून आपण त्याचे स्वागत करतो. बलात्का–याला जाहीर शिक्षा देण्याची मागणी करतो,

गुंड वा समाजकंटकांना कायद्याने नव्हे तर कायदा हातात घेऊन चाप लावण्याची मागणी करतो किंवा असा कायदा हातात घेणा–यांचे अभिनंदन करतो, त्यांना डोक्यावर घेतो. हे सगळे पुढे जाऊन अराजकाची स्थिती निर्माण करणारे आणि त्यातून सामान्यांनाच होरपळीत घालणारे आहे याचाच आपल्याला विसर पडला आहे की काय? अशीच शंका निर्माण होण्याची स्थिती आहे. विशेष म्हणजे ज्यांच्यावर कायद्याच्या राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी आहे त्यांनाच हल्ली कायदा हाती घेण्याच्या या संकल्पनेची भुरळ पडली आहे. कठोर, शिस्तप्रिय प्रशासक अशी स्वत:ची प्रतिमा जनमानसात रुजवण्याच्या नादात कायदा हातात घेणा–या राज्यकर्त्यांना आपण आपल्यावरील जबाबदारीलाच छेद देत असल्याचे भान राहिलेले नाही. त्यातून 'बुलडोझर बाबा', 'बुलडोझर मामा', 'बुलडोझर भाई' वगैरे तयार झाले व त्यांच्या चेल्याचपाट्यांनी त्यांच्या अशा कामगिरीला 'लोकप्रिय' वगैरे ठरवण्याचे उद्योग उघडपणे सुरू केले. मात्र, हा तथाकथित 'झटपट न्याय' सर्वांसाठी समन्यायी नाही, हेच अनेक घटनांमधून दिसून आले. याचाच अर्थ या झटपट न्यायाच्या चुकीच्या संकल्पनेचा उघड गैरवापरच सुरू झाला आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयानेच या बुलडोझर संस्कृतीस बेकायदेशीर ठरवून त्यास चाप लावला याचे कायद्याच्या राज्यावर विश्वास व श्रद्धा असणा–या प्रत्येक भारतीय नागरिकाने स्वागतच करायला हवे! झटपट न्यायाच्या नावाखाली दिल्लीतील जहांगीरपुरी, मध्य प्रदेशातील रतलाम, राजस्थानातील उदयपूर, उत्तर प्रदेशातील असंख्य ठिकाणी अल्पसंख्याक समाजाच्या आरोपींची घरे बुलडोझर लावून पाडण्यात आली. अशा कारवाईच्या विरोधात उच्च न्यायालयांमध्ये व सर्वोच्च न्यायालयातही याचिका दाखल झाल्या होत्या. या याचिकांवर तोंडी मतप्रदर्शन करताना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई व न्या. के. व्ही. विश्वनाथन यांनी 'आरोपींची घरे अशी जमीनदोस्त करून तडकाफडकी न्याय देण्याची कृती योग्य नाही,' असे मत व्यक्त केले आहे.

या घरात राहणाऱ्यया इतर नागरिकांच्या मानवी अधिकारांचा मुद्दा या प्रकरणांमध्ये महत्त्वाचा आहे आणि सर्वोच्च न्यायालयाने नेमकेपणाने त्यावरच बोट ठेवले आहे. घरात वास्तव्य करण्याचा अधिकार हा भारतीय राज्यघटनेतील एकविसाव्या कलमात अंतर्भूत आहे. हे कलम जगण्याचा आणि मूलभूत स्वातंत्र्याचा प्रत्येक नागरिकाचा अधिकार स्पष्ट करते. एखाद्या व्यक्तीच्या डोक्यावरचे छप्परच पाडून टाकणे हे त्या नागरिकाच्या मूलभूत अधिकारावरचे अतिक्रमणच आहे आणि न्यायालयाने तेच सूचित केले आहे. 'एखाद्या वडिलांचा मुलगा गुन्हेगारी वर्तन करणारा आहे म्हणून या मुलाच्या आईवडिलांना बेघर करून रस्त्यावर आणणे योग्य आहे का?', असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला आहे व तो अतिशय योग्यच आहे. अर्थात न्यायालयात आपल्या 'झटपट न्याया'चे समर्थन प्रशासन वा राज्यकर्त्यांकडून अत्यंत हुशारीने केले जाते. समर्थन करताना आपण कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्यासाठी झटत असल्याचेच चित्र रंगविले जाते.

न्यायालयात उत्तर प्रदेश सरकारची बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहतांनी सांगितले की, गुन्हेगारी कारवायांबाबत अजिबात क्षमा न दाखविण्याचे उत्तर प्रदेश सरकारचे धोरण आहे आणि तेच यापुढेही कायम राहील आणि कोणतीही कारवाई करताना घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेतली जाईल. प्रत्यक्षात उत्तर प्रदेशात कशा 'सलेक्टिव्ह' कारवाया झाल्या त्या सर्वांनीच उघड्या डोळ्यांनी बघितल्या आहेत. अशा कारवायांचे समर्थन करताना प्रशासनाकडून अतिक्रमण वा अवैध बांधकामाचा हुकमी मुद्दा वापरला जातो. मात्र, हे अतिक्रमण व अवैध बांधकाम होताना प्रशासन, सरकार काय करत होते? या प्रश्नावर प्रशासन, राज्यकर्ते मूग गिळून गप्प बसतात! शिवाय प्रशासन दरवर्षी शेकडो, हजारोंना अतिक्रमण व बेकायदा बांधकामाबाबत नोटिसा पाठवते. त्यातली किती बांधकामे बुलडोझर लावून पाडली जातात? अनधिकृत बांधकामांना संरक्षण मिळायलाच नको. मात्र, ते कारण पुढे करून प्रत्यक्षात 'झटपट न्याय' पूर्ण करणे कितपत योग्य आहे? न्यायाला विलंबामुळे वा गुन्हेगारांकडून कायद्यातील पळवाटांचा वापर होण्यामुळे कंटाळलेल्या जनतेला 'झटपट न्याया'चे आकर्षण वाटणे साहजिक. मात्र या आकर्षणात धोकेच जास्त आहेत.

पहिला धोका न्यायसंस्थेचे अप्रत्यक्ष अवमूल्यन होऊन कायद्याच्या राज्यावरचा विश्वास उडण्याचा तर दुसरा अशा कारवायांच्या नावाखाली राजकीय, धार्मिक, जातीय विद्रोषाची पोळी भाजून घेतली जाण्याचा असतो. हे वेळीच रोखले नाही तर अराजकाची स्थिती अटळ बनते आणि असे अराजक अंतिमत: सर्वसामान्यांच्या मुळावर उठणारेच असते. सर्वोच्च न्यायालयाने हा धोका लक्षात घेऊनच अशा 'झटपट न्याया'ला कायद्याच्या राज्यात अजिबात स्थान नसल्याचे स्पष्ट केले आहे. कायद्याचे राज्य राबविताना कायद्यालाच बगल देणारे 'शॉर्ट कट' चालणार नाहीत, हा सर्वोच्च न्यायालयाचा इशारा हा देश व समाजहितासाठी अत्यंत मोलाचाच आहे. जर भारतात कायद्याचे राज्य आहे आणि राज्यकर्ते 'सबका साथ, सबका विकास'च्या घोषणा देतात तर मग एखाद्यावर केवळ आरोप झाले म्हणून त्याचे घर वा इतर वास्तू बुलडोझर लावून उद्ध्वस्त करण्याची गरजच काय? या न्यायालयाच्या टोकदार प्रश्नावर राज्यकर्त्यांनीच नव्हे तर सामान्यांनीही प्रामाणिक आत्मचिंतन करायला हवे!

# गणेश मंडळाच्या शांतता बैठकित पोलिसांकडून नियमावली जारी!

**शिरूरकासार । प्रतिनिधी**

**गणेश उत्सव आता तोंडावर आला असुन गणपती मंडळाकडून जय्यत तयारी सुरू असताना पोलीसाकडून शांतता बैठकिचे बुधवारी चार वाजता आजोजन केले होते त्यात पोलिसाकडून गणपती उत्सव काळातील स्थापना ते विसर्जनापर्यंतची नियमावली जारी करून गणपतीचा आनंद तुम्ही घ्या आणि दुस–यांना देखील घेऊ द्या असे आवाहन करण्यात आले.**



स.पो.नी .घणेश धोकरट व पो.उप निरीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी उपस्थित गणेश भक्तांना मार्गदर्शन केले त्यात गणपतीच्या मुर्तीची सुरक्षा व पावित्र्य सांभाळा ,मंडळात बावन्न पानी पोथी लावू नका त्यापेक्षा वाचनीय पुस्तके ,धर्मग्रंथ ठेवा ,लाइटची रितसर परवानगी घ्या ,मंडळाने चोवीस तास स्वयंसेवक ठेवावे ,मद्यपानाला थारा देऊ नका ,सामाजिक उपक्रम साजरे करा ,धार्मिक वा जातीय तेढ निर्माण होईल असे कुठलाही देखावा अथवा अन्य प्रयोग करू नका ,राजकीय ,सामाजिक धार्मीक महापुरूषांची हेळसांड होईल असे कोणतेही कृत्य करू नका ,शालेय विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यासाठी विविध स्पर्धा आयोजित करा ,सामाजीक सलोखा अबाधीत ठेवा ,सि सि टी व्ही बसवा ,आग नियंत्रण उपाय योजना आदी महत्लपुर्ण देतांना विसर्जन काळात पारंपारीक वाद्याला प्राधान्य द्या ,डी जे तर नाहीच आणि लावलाच तर विसर्जनानंतर डी जे पोलीस स्टेशनला कार्यवाही साठी असेल ,मिरवणूक लवकर काढा व विहीत वेळेचे बंधन पाळा ,मिरवणूक मार्गावर गणपती मंडळाने परस्पर सलोखा ठेवा अशा मार्गदर्क सुचना सांगितल्या ,विसर्जन कालावधी पोलीस स्टेशन स्तरावर वाढून मिळणार नाही ,वरिष्ठाकडून परवानगी आणावी लागेल नियमावली आम्ही सांगितली तुम्ही नियमावलीचे पालन करा असे आवाहन यावेळी पोलीस अधिकारी धोकरट व कुलकर्णी यांचेकडून करण्यात आले. बहुतांश गणेश मंडळाचे प्रतिनीधी यावेळी उपस्थित होते.शेवटी आभार गोकुळ पवार यांनी मानले.

# कार्यशाळेतून पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनवण्याचा संदेश!

## दहा शाळेचे विद्यार्थी झाले होते सहभागी

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

**येथील कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील समाजशास्त्र व गृहशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली त्यात दहा शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.**



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य विश्वास कंधारे ,प्रमुख पाहुणे प्रो. मोहन परजणे ,कार्यशाळेचे प्रशिक्षक म्हणून गृहशास्त्र विभागप्रमुख डॉ. चेतना डोंगळीकर या होत्या. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय तुपे कार्यक्रमाचे संयोजक समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुधीर येवले, प्रा. प्रज्योत गायके उपस्थित होते. गणपती मुर्तीच्या विसर्जनानंतर पर्यावरणाला हानी पोहचू नये यासाठी शाडू मातीचे गणपती बनवावे असा महत्वपूर्ण सल्ला प्रा.मोहन परझणे यांनी दिला .भावनबरोबर कर्तव्याची व सामाजिक बांधिलकिचे स्मरण महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. ही कार्यशाळा सलग चार वर्षापासून आमच्या महाविद्यालयात राबविली जाते आज या कार्यशाळेचे चौथे वर्ष आहे. या कार्यशाळेत शिरूर परिसरातील १० शाळेतील १४० विद्यार्थी सहभागी झाले होते.प्रास्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख व संयोजक डॉ.सुधीर येवले यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सय्यद अफरोज यांनी केले, उपस्थित मान्यवरांचे आभार डॉ. श्यामा लोमटे यांनी मानले.

# अल्पवयीन मुलीवर विनयभंग केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हे दाखल!

**शेवगाव । प्रतिनिधी**

शेवगाव शहरात अल्पवयीन मुलींना धमकवल्या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात पोस्को अंतर्गत व इतर दोन असे चार वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सचिन व अमर साहेबराव काते रा. सामनगांव, ता . शेवगाव असे आरोपींचे नावे आहेत. यातील एक आरोपी तडीपार असतांनाही हे गुन्हे दाखल झाल्याने शहरातील वातावरण भयभीत झाले आहे.

फिर्यादीमध्ये म्हटले, गुरुवारी सकाळी सुमारास कॉलेज सुटल्याने मैत्रिणी सोबत घरी जात असतांना पाठी मागून विनाक्रमांकाच्या कारमधून आलेल्या इसमाने गाडीच्या काचा खाली घेत मला पाहून म्हणाला अकरा वाजण्याच्या रस्त्यावरुन बाजूला चला, गाडी जायला रस्ता नाही, असे म्हणून शिवीगाळ केली. युवतीने शिवीगाळ करु नका, व्यवस्थित बोला असे म्हटले असता, बाजूला बसलेल्या इसमाने गाडीतून हात बाहेर काढून ओढणीला धरुन ओढले. तसेच लज्जा उत्पन्न होईल, असे वर्तन केले. यावेळी आरडाओरड केल्याचे म्हटले आहे. गुन्हा दाखल होताच, ते दोघे पसार झाले असून त्यांचा शोध घेण्यासाठी पथक रवाना केल्याचे पोलीस निरीक्षक समाधान नागरे यांनी सांगितले आहे. त्यानंतर पुन्हा एका अल्पवयीन मुलीला दोघांनी धमकावले. याप्रकरणी पोस्कोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर काते याने पुन्हा एकाला धमकी दिली. हा प्रकार पोलीसांना सांगितला म्हणून संजय नांगरे यांना ही धमकी दिली. त्यामुळे नांगरे यांनी सचिन व अमर काते या दोघांभावाविरूध्द गुन्हा दाखल केला. यातील आरोपी सचिन काते याच्यावर १६ विविध ठिकाणी गुन्हे दाखल असुन तडीपार ही करण्यात आलेले आहे. तो तडीपार असतांनाही खुलेआम शेवगाव मध्ये फिरून अल्पवयीन मुलींचा विनयभंग केल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. त्याच्या अटकेसाठी पोलीस पथके तैनात करण्यात आली आहेत. आरोपींना त्वरित अटक न केल्यास नातेवाईक व नागरिकांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.




## पान १वरून...

### शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी

कंपनीला ७ मार्च २०२४ रोजी कार्यादेश देण्यात आला तसेच १७ मे रोजी वीजखरेदी करार करण्यात आला. त्यानंतर अवघ्या साडेचार महिन्यांत प्रकल्प उभारून ५ सप्टेंबर रोजी कार्यान्वित करण्यात आला आहे. हा प्रकल्प महाविरणच्या धोंदलगाव ३३ केव्ही उपकेंद्राशी जोडण्यात आला आहे. त्यामुळे उपकेंद्रातून निघणाऱ्या ५ वीज वाहिन्यांवरील १७५३ शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा मिळणार आहे. धोंदलगाव, नालेगाव, अमानतपूरवाडी व संजरपूरवाडी या गावांतील शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जून २०२२ रोजी सत्तेची सूत्रे स्वीकारल्यानंतर किमान तीस टक्के कृषी फीडर्स डिसेंबर २०२५ पर्यंत सौर ऊर्जेवर चालविण्यासाठी मिशन २०२५ जाहीर केले होते. त्यानंतर मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला गती देण्यात आली. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चा विस्तार करून त्याची व्याप्ती वाढविण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाने नुकतीच मान्यता दिली आहे. मिशन मोडवरील या योजनेतून सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेचे उद्दिष्ट ७ हजार मेगावॅटने वाढवून १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा क्षमता निर्मिती उद्दिष्टास शासनाने मान्यता दिली आहे. यामुळे राज्यातील शंभर टक्के कृषी पंप ग्राहकांना दिवसा वीजपुरवठा होणार आहे.

------

### फडणवीसांचा आ.राऊतांच्या

दिला.भर पावसात झालेल्या या बैठकीस सभेचे रूप आले होते. मराठा आरक्षणासाठी गेल्या वर्षेभरापासुन अविरत आंदोलन करत असलेले मराठा यौध्दा मनोज जरांगे पाटील हे घोंगडी बैठकीच्या माध्यमातुन संवाद साधत असुन, आज दि.६ सप्टेंबर रोजी माजलगाव विधानसभा मतदार संघातील तेलगाव ता.धारूर येथे दुसर्या घोंगडी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी उपस्थित हजारो समाज बांधवांशी संवाद साधताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की,मराठा समाजास ओबीसीतुन आरक्षण मिळावे. यासाठी गेल्या वर्षेभरापासुन आपण लढत असुन, सरकार आरक्षण देण्यास टाळाटाळ करत आहे.आरक्षणाच्या मुद्द्यावर महाराष्ट्रातील सर्व मराठा समाज एकत्रित आला असुन, यातुन मराठ्यांनी आपली एकजुट दाखवुन दिली आहे.आपल्याला जो पर्यंत आरक्षण मिळत नाही तो पर्यंत आपली एकजुट अशीच कायम ठेवा.असे आवाहन करत मला राजकारणाची अथवा निवडणुकीची लालसा नाही.मला फक्त माझ्या गोरगरीब मराठा समाजाला आरक्षण मिळवुन द्यायचे असुन,मराठ्याच्या लेकरांना आरक्षण द्यायचे आहे.त्यासाठीच माझा लढा असल्याचे जरांगे यांनी म्हटले.पुढे बोलताना ते म्हणाले की,राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बार्शीचे आ.राजेंद्र राऊत यांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील मराठा समाजात फुट पाडण्याची खेळी खेळत आहेत. मात्र मराठा समाज त्यांची ही खेळी ओळखून आहे.आ.राऊत यांनी ही आपली पोपटपंची जास्त करू नये.असा इशारा आ.राउतांचा समाचार घेण्यासाठी व त्यांना प्रतिउत्तर देण्यासाठी आपण लवकरच बार्शीत सभा घेणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.येत्या विधानसभा निवडणुकीत मराठा समाजाने सावध भुमिका घेत कोणत्याही राजकीय नेत्यांच्या मागेपुढे करू नका. आपल्या लेकरांच्या भविष्याचा विचार करा. जो आपल्याला आरक्षण देईल, तोच आपला. हे लक्षात ठेवा असे म्हटले.सकाळी ११ वा होणारी घोंगडी बैठक दुपारी तीन वाजता चालु झाली.ही बैठक होती मात्र उपस्थित जनसमुदाय पाहता ती मोठी सभाच झाली.याबैठकीस हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता.

**तेलगाव पासुन ते बैठकस्थळ अशी ३ किमी रॅली**

मनोज जरांगे पाटील यांची घोंगडी बैठकी धारूर रोडवरील जिजाऊ मंगल कार्यालयात आयोजित केली होती.यासाठी जरांगे पाटील यांची तेलगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौका ते जिजाऊ मंगल कार्यालयात अशी तीन किमी रॅली काढण्यात आली.यावेळी ठिकठिकाणी पाटील यांचे महिलांनी औक्षण केले.

**बैठक चालु होण्याक्षणीच पावसाची हजेरी**

मनोज जरांगे पाटील हे बैठक स्थळी येताच पावसास सुरूवात झाली.अशा भर पावसात पाटील हे रोड पासुन आत पर्यंत पायी चालत आले.प्रथम मंगल कार्यालय आवारात व्यासपीठ उभारण्यात आले होते.परंतु पावसामुळे नंतर मंगल कार्यालयात बैठक घेण्यात आली.मात्र भर पावसात जरांगे पाटील हे बाहेर उभारण्यात आलेल्या व्यासपीठावर जाऊन, उपस्थितांना हात उंचावून अभिवादन करून नंतर मंगल कार्यालयात आले.

**चहापाणी व नाष्ट्याची व्यवस्था**

या कार्यक्रमास उपस्थित असलेल्या लोकांसाठी अनेक ठिकाणी चहापाणी व नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली होती.

-------------

### आपत्ती व्यवस्थापनाबाबत

परिषद २०२४ च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विनय राठोड, छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस उपआयुक्त नितीन बगाटे, उपायुक्त जगदिश मिनीयार, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर व उपायुक्त नयना बोंदार्डे उपस्थित होते. विभागीय आयुक्त श्री. गावडे म्हणाले, आपत्तीच्या वेळी तत्परतेने योग्य निर्णय घेत निर्णयाची अंमलबजावणी केली पाहीजे. आपत्तींना कशाप्रकारे तोंड देता येईल, प्रशासकीय यंत्रणा कसे कार्य करतात, त्यासाठी प्रशासनाला कशा पद्धतीने सहकार्य अपेक्षित आहे, याची माहिती आणि जाणीव परस्परांना असणे आवश्यक आहे. यासाठीच या विषयातील मान्यवर व तज्ज्ञांसह आपल्याशी थेट संवाद होत आहे. आपत्ती व्यवस्थापनाबाबतचे हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अचानक येणाऱ्या आपत्तीच्या काळात समयसूचकता अत्यंत महत्वाची आहे. अत्यंत बारकाईने नियोजन करुन संवादद्वारे परिस्थितीनुसार निर्णय घेणे महत्त्वाचे असते. अशावेळी स्थानिक नागरिक आणि प्रशाकीय यंत्रणा यांनी समन्वयाने काम करावे. मदत व बचावकार्यात स्थानिक नागरिकांचा सहभाग वाढवावा. आजच्या या कार्यशाळेतून प्रशिक्षण घेतल्यानंतर आपल्या भागात आपत्तीच्या वेळी आपण दक्ष असायला हवे, असेही श्री गावडे म्हणाले. लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे म्हणाल्या, आपत्तीच्या कालावधीत आपत्तीपूर्व व आपत्तीच्या वेळी नियोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. आपत्तीमध्ये सुरक्षित राहण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाविषयी सर्वांना माहिती असणे आवश्यक आहे. आपण जनसामान्यपर्यंत आपत्ती व्यवस्थापनाबाबत व्यापक जनजागृती करणे आवश्यक असून प्रत्येकांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले, आपत्तीच्या काळात आपण सदैव दक्ष असणे गरजेचे आहे. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी लक्ष देवून दक्ष रहावे लागते. अचानक येणाऱ्या आपत्तीच्या वेळी काय करावे तसेच आपल्या घरात प्राथमिक सुविधा असणे आवश्यक आहेत. नैसर्गिक आपत्ती येवू नये मात्र आलीच तर त्याला कसे सामोरे जावे यासाठी आजचे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. प्रशिक्षणात सहभागी प्रत्येकाने आपत्तीच्या वेळी दक्ष रहावे, असेही ते म्हणाले. पोलीस उपआयुक्त नितीन बगाटे यांनी चंद्रपूर जिल्हयात जंगली भागात लागलेली आग व छत्रपती संभाजीनगर येथील गॅस गळती या आपत्तीच्या वेळी प्रशासन व नागरिकांचा सहभाग याबाबतचे अनुभव सांगितले. आपत्ती व्यवस्थापन आणि लाइटनिंग सुरक्षा आणि संरक्षण उपायांमध्ये तरुणांची भूमिका या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र लातूर येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रमोद पाटील यांनी मार्गदर्शन केले. सार्वजनिक आरोग्य आपत्कालीन व्यवस्थापन आणि आंतर विभागीय समन्वय याबाबत घाटी रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. राजेंद्र अंकुशे यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात उपस्थितांबरोबर चर्चा –प्रश्न झाले. यामध्ये डॉ. प्रमोद पाटील डॉ. राजेंद्र अंकुशे श्री. अनिल नलावडे यांनी मार्गदर्शन केले. परिषदेत आपदा मित्र, बचाव कार्यात सहभागी होणाऱ्या विविध सेवाभावी संस्था, होतकरू नागरिक, गिर्यारोहक संघ, सरपंच, युवक–युवती, आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक्रमास प्रविष्ठ असणारे महाविद्यालयीन, विद्यापीठातील युवक तसेच इतर पदाधिकारी व बचाव कार्य करणाऱ्या यंत्रणांमधील अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग घेतला. कार्यशाळेचे संयोजन निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर व उपायुक्त नयना बोंदार्डे यांनी केले. परिषदेला विभागातील आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी, पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---------------

### धनंजय मुंडेंच्या नाथ

९ सप्टेंबर, सोमवार, अभिनेत्री अमृता खानविलकर, पूजा सावंत, समीरा गुजर, संस्कृती बालगुडे, प्रसंनजीत कोसंबी व अंशिका चोनकर यांचा महाराष्ट्राच्या तारका हा सुप्रसिद्ध संगीतमय कार्यक्रम. १० सप्टेंबर, मंगळवार : सुप्रसिद्ध बॉलीवूड सिनेतारका, ड्रीमगर्ल, हेमामालिनी यांचा राधा कृष्ण लीला दर्शवणारी शास्त्रीय नृत्याद्वारे विशेष प्रस्तुती. ११ सप्टेंबर, बुधवार : महाराष्ट्राची संस्कृती अंतर्गत या अभिनेत्री मानसी नाईक, माधुरी पवार, मीरा जोशी, हेमलता बने, ऐश्वर्या बदडे यांचा संगीतमय कार्यक्रम. १२ सप्टेंबर, गुरुवार : इंडियाज गॉट टॅलेंट फेम क्रेझी हॉपर्स ग्रुप आग्रा यांचा नृत्य थरार व हिंदवी पाटील व प्राजक्ता गायकवाड लावणी यांची जुगलबंदी. १३ सप्टेंबर, शुक्रवार : चला हवा येऊ द्या सहभाग – स्मिता गोंदकर, जुई बेंडकले, हेमांगी कवी, सागर करंडे, भारत गणेशपुरे, कुशल बद्रिके, गौरव मोरे, श्रेया बुगडे व इतर १४ सप्टेंबर, शनिवार : महाराष्ट्राची हास्य जत्रा सहभाग – समीर चौगुले, पृथ्वीक प्रताप, नम्रता संभेराव, वनिता खरात, प्रसाद खांडेकर, शिवाली परब, चेतना भट व इतर. १५ सप्टेंबर, रविवार : अजय अतुल लाईव्ह, जगप्रसिद्ध गायक, गीतकार व संगीतकार अजय व अतुल गोगावले यांचा ५० कलाकारांच्या संचासह लाईव्ह गीतांचा कार्यक्रम. १६ सप्टेंबर, सोमवार – प्रसिद्ध गायक आनंद शिंदे व टीमचा भीमगीतांचा खास कार्यक्रम. दरम्यान या गणेश महोत्सवाच्या निमित्ताने धनंजय मुंडे साहेब यांच्या संकल्पनेतून परळी वासियांना तसेच बीड जिल्ह्यातील गणेश भक्तांना सांस्कृतिक कार्यक्रमांची मोठी मेजवानी अनुभवास मिळणार असून या गणेश महोत्सवात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे व कार्यक्रमांचा आनंद घ्यावा, असे आवाहन ज्येष्ठ नेते तथा नाथ प्रतिष्ठानचे कार्यवाह वाल्मीक अण्णा कराड यांनी केले आहे.

------------

### राज्यात ५२.४६ टक्के

फडणवीस यांनी दिली. राज्यातील एकूण परकीय गुंतवणुकीबाबत माहिती देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात २०१४ ते २०१९ या काळात सत्तेत असताना एकूण ३ लाख ६२ हजार १६१ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली होती. आता सव्वा दोन वर्षांत ३ लाख १४ हजार ३१८ कोटी रुपयांची गुंतवणूक शासनाने राज्यात आणली. दुसऱ्या तिमाहीची आकडेवारी अजून बाकी असल्याने एकूण गुंवणुकीचा आकडा आणखी वाढणार आहे, असे ते म्हणाले. एप्रिल ते जून २०२४ या तिमाहीत राज्यांमध्ये झालेली गुंतवणूकीत पहिला क्रमांक महाराष्ट्र (७०,७९५ कोटी), दुसरा कर्नाटक (१९,०५९ कोटी), तिसरा दिल्ली (१०,७८८ कोटी), चौथा तेलंगणा (९०२३ कोटी), पाचवा गुजरात (८५०८ कोटी), सहावा तामिळनाडू (८३२५ कोटी), सातवा हरियाणा (५८१८ कोटी), आठवा उत्तरप्रदेश (३७० कोटी), नववा राजस्थान (३११ कोटी) याप्रमाणे आहे.

-----------

### केजमध्ये चोरटे पकडले

रात्र जागून काढली त्यानंतर सकाळी पोलिसांना फोन करून त्या चोरट्यांना पोलिसांच्या हवाली करण्यत आले असून पुढील तपास केज पोलिस करत आहेत.

-----------

**टी.सी.हरवला आहे.**

दिनांक ४/९/२०२४ रोजी गेवराई ते बीड प्रवास करताना Vaishnav Ghansham Rameshdas या नावाचा एम. ए. प्रथम वर्ष टि.सी. हरवला आहे. सापडल्यास संपर्क करावा.

**संपर्क क्रमांक::** ८२७५५२०२३६

cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. ७ सप्टेंबर २०२४



## गणेशोत्सव साजरा करताना कायदा व सुव्यवस्थेचे काटेकोरपणे पालन करा –सपकाळ



पिंपळवंडी : आज शनिवार पासून लाडक्या गणरायाचे आगमन होऊन गणेशोत्सवाला सुरुवात होत आहे.हा उत्सव साजरा करताना गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून उत्साह उत्सवादरम्यान वादविवाद न करता खालीलप्रमाणे नियमांचे पालन करून गणेशोत्सव साजरा करावा,असे मार्गदर्शन अंमळनेर पोलिस ठाण्याचे स.पो.नि.भार्गव सपकाळ यांनी पिंपळवंडी येथे शांतता बैठकीत केले. अंमळनेर पोलीस ठाण्याच्या वतीने गणेशोत्सव,ईद–ए–मिलाद या सण उस्तवाच्या अनुषंगाने शांतता सलोखा अबाधित राहावा यासाठी अंमळनेर,पिंपळवंडी,डोंगरकिन्ही येथे शांतता बैठक घेण्यात आली.

यावेळी स.पो.निरीक्षक सपकाळ यांनी ग्रामस्थांना एक गाव एक गणपती संकल्पना राबवावी,मंडळाचा आक्षेपार्ह देखावा नसावा. मिरवणुकीचा मार्ग मज्जिद अथवा विशिष्ट जागी,धर्माच्या वाड्या, वस्तीवरून नसावा,डी.जे.वाद्य नसावीत,पारंपारिक वाद्य असावे, स्टेज मजबूत असावे,लाइट वापर व्यवस्थित (शॉक रोधक) असावा, मूर्तीची कोणत्याही प्रकारे विटंबना होणार नाही याची दक्षता घ्यावी. पदाधिकाऱ्यांनी २४ तास मंडळाच्या ठिकाणी हजर राहणे आवश्यक आहे, प्रसादातून (खवा पेढा) विष बाधा होणार नाही याची काळजी घ्यावी. गणेश मंडळाच्या मंडपात व मिरवणुकीत लावण्यात येणारी गाणी कोणत्याही धर्माच्या लोकांच्या भावना दुखावणारी नसावीत.आदी नियमावलीची सविस्तर माहिती सांगून गणेश मंडळांनी सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणाऱ्या गणेश मंडळांना बक्षीस देण्यात येणार असून,तसेच आदर्श मंडळ स्पर्धाचे आयोजन केले आहे. याची माहिती याप्रसंगी दिली.

# नितेश राणेंवर गुन्हा दाखल करून आमदारकी रद्द करा –राजेसाहेब देशमुख

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मुस्लिम धर्मियांबाबत आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी आमदार नितेश राणे यांच्या विरोधात परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी केली आहे.

काही दिवसांपूर्वीच आमदार नितेश राणे यांनी मुस्लिम धर्मियांबाबत वादग्रस्त विधान केले होते. या विधानावरून नितेश राणे यांच्या विरोधात परळी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दाखल करण्यासाठी बुधवार, दिनांक ४ सप्टेंबर रोजी परळी शहरासह तालुक्यातील सकल मुस्लिम धर्मिय समाज बांधव यांनी पोलिस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन केले. या ठिय्या आंदोलनात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख हे ही सहभागी झाले होते. यावेळी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष देशमुख म्हणाले की, मुस्लिम धर्मियांबाबतीत बदनामीकारक घोषणा देऊन राणे यांनी धार्मिक भावना दुखावल्या आहेत. आ.राणे यांनी हे वक्तव्य अहमदनगर येथे केले आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचे राज्य आहे. या ठिकाणी अठरापगड जातीधर्म पंथाचे लोक गुण्या गोविंदाने नांदत आहेत. परंतु, आ.राणे यांच्यासारख्या काही वाचाळवीर नेत्यांमुळे महाराष्ट्राचा सामाजिक सलोखा बिघडत चालला आहे. जातीजातीत तेढ निर्माण होईल अशी चुकीची, वादग्रस्त वक्तव्ये करून आ.राणे हे मुस्लिम समाजाच्या भावना वारंवार दुखाविण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसेच सतत अशीच वक्तव्ये करण्याची मालिका त्यांनी सुरूच ठेवली आहे. मुस्लिम समाजाविषयी




धमकी वजा, द्वोषपूर्ण, गरळ ओकणारे, चिथावणी देणारे भाषण करणाऱ्या आ.नितेश राणेंवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात आली पाहिजे, कारण, त्यांनी मुस्लिम समाजाला उद्देशून अतिशय शिवराळ भाषेचा वापर केला आहे. यामुळे समस्त मुस्लिम समाजाच्या भावना पुन्हा एकदा दुखावल्या गेल्या असून दोन समाजात विनाकारण तेढ निर्माण करण्याचा आमदार नितेश राणेंचा वाईट हेतू आहे. राणेला ना कायद्याची भीती राहिली आहे ना, पोलिस प्रशासनाची. राणे यांनी आपल्या भाषणात मुस्लिमांना जाहीर धमकीच दिली आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे मुस्लिम समाजात संतापाची तीव्र भावना निर्माण झाली आहे. वादग्रस्त भाषणातील अनेक वक्तव्यांमुळे समाजात तणावाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. भाजप ताकद देत असलेल्या अशा चुकीच्या प्रवृत्तींकडून राज्यात सांप्रदायिक हिंसा भडकविण्याचा प्रयत्न केला जात आहे असे दिसून येते. परंतु, याला पुरोगामी, धर्मनिरपेक्ष जनता व काँग्रेस पक्ष कदापीही यशस्वी होवू देणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी. स्वतःला हिंदू समाजाचा गब्बर उद्देशणारे भाजप आमदार नितेश राणेंवर गुन्हा दाखल करीत तात्काळ अटक करण्याची मागणी बीड जिल्हा काँग्रेस या ठिकाणी करीत आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण बीड जिल्ह्यात कायदा, सुव्यवस्था व शांतता अबाधित रहावी. यासाठी आ.नितेश राणेंवर कठोर कायदेशीर कारवाई करून गुन्हा नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. जेणे करून पुन्हा अशा पध्दतीचे बेताल वक्तव्य करण्याची कोणी हिंमत करणार नाही. याच संदर्भाने आ.राणेंची आमदारकी ही रद्द करण्यात यावी अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी केली आहे. यावेळी परळी शहर व तालुक्यातील सकल मुस्लिम धर्मिय समाज बांधव यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## गौरी महालक्ष्मी आरास देखावा स्पर्धेचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील गणेश मंडळाना प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या केज विधानसभेच्या नेत्या डॉ अंजली ताई घाडगे यांच्या वतीने भव्य गणेश विसर्जन मिरवणूक स्थानिक देखावा व गौरी महालक्ष्मी आरास देखावा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

केज विधानसभेच्या नेत्या डॉक्टर अंजलीताई घाडगे यांच्या संकल्पनेतून अंबाजोगाईतील गणेश भक्तांसाठी खास करून गणेश विसर्जण मिरवणूक देखावा स्पर्धेचे आयोजन केले असून यासाठी प्रत्येक गणेश मंडळांनी नोंदणी करणे आवश्यक आहे प्रत्येक गणेश मंडळांनी परीक्षणासाठी आलेल्या अधिकृत निरीक्षकांना मिरवणूक नियोजनाविषयी माहिती देणे बंधनकारक असेल विजेत्या गणेश मंडळांना ११११११ रुपयांचे प्रथम पारितोषिक,७१११ रुपयांचे द्वितीय,५१११ रुपयांचे तृतीय व ३ उत्तेजनार्थ पारितोषिक डॉ अंजली ताई घाडगे यांच्या वतीने देण्यात येणार आहे.

गौरी महालक्ष्मी सजावट करणाऱ्या अंबाजोगाई तालुक्यातील महिलांसाठी भव्य गौरी महालक्ष्मी आरास स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून यासाठी ही नोंदणी करणे आवश्यक आहे महालक्ष्मी आरास देखावे व माहिती मोबाईल मध्ये चित्रित करून संग्राम महाराष्ट्राचा न्यूज चॅनलचे संपादक अभिजीत लोमटे यांच्या ९०४९४४४४७४ या व्हाट्सअप नंबर वर टाकायचे आहेत सदरील व्हिडिओ संग्राम महाराष्ट्राच्या न्यूज चैनल वर प्रसारित केली जातील जनतेचा कौल आणि परीक्षकांच्या गुण यानुसार महालक्ष्मी आरास देखावा स्पर्धेचे विजेते जाहीर केले जातील परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील या स्पर्धेच्या विजेत्यांसाठी प्रथम ५१११ रुपयांचे पारितोषिक द्वितीय ३१११ रुपयांचे तर तृतीय २१११ रुपयांचे पारितोषिक याशिवाय तीन उत्तेजनार्थ पारितोषिक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या केज विधानसभेच्या नेत्या डॉक्टर अंजलीताई घाडगे यांच्या वतीने देण्यात येणार असल्याची माहिती संयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.



माजलगाव : राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्या वतीने सन २०२०–२०२१ करीता महाराष्ट्र विधानसभा 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल कारखाना प्रशासनाच्या वतीने आ.प्रकाश सोळंके यांना शुभेच्छा देताना कार्यकारी संचालक आर.सी.बडगुजर आणि सर्व खातेप्रमुख

## शिक्षकांनी आदर्श जीवन पद्धती अंगीकृत करावी – कविवर्य प्रभाकर साळेगावकर

माजलगाव । प्रतिनिधी

शिक्षक हा विद्यार्थी मनाचा आरसा असून जसा शिक्षक असेल तसाच विद्यार्थी दिसेल अशी आजची परिस्थिती आहे म्हणून आजच्या शिक्षकांनी चारित्र्य संपन्न राहून आदर्श जीवन पद्धती अंगीकृत करावी व विद्यार्थ्यांची आदर्श पिढी निर्माण करावी असे प्रतिपादन जेष्ठ कविवर्य श्री प्रभाकर साळेगावकर यांनी केले आहे.

फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी मध्ये दि ०५ सप्टेंबर गुरूवार शिक्षक दिनानिमित्त शाळेतील शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला त्यानिमित्ताने आयोजित



कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ साहित्यिक प्रभाकर साळेगावकर बोलत होते. विद्यार्थी व शिक्षकांशी हितगुज साधताना त्यांनी आपली एक छोटी कथा व ''छान छान गुरुजी माझे'' ही लोकप्रिय कविता सादर करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले,समाजात शिक्षकाचे स्थान खुप मोठे असून जगात सर्वत्र शिक्षकी पेशाचा आदर करून शिक्षकाला सन्मान दिला जातो,शिक्षक खुप मेहनत व परिश्रम घेऊन विद्यार्थी घडवतो,जो शिक्षक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवत शिकवतो तोच खरा शिक्षक समजला जातो असे त्यांनी शेवटी सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पुजन व अभिवादन करून करण्यात आली.

याप्रसंगी स्टार स्टुडंट्स अवॉर्ड देऊन गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमास सेवानिवृत्त शिक्षक श्री पवार सर उपस्थित होते.त्यांनी ही शिक्षक दिनाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेत शिक्षक बनून तासिका घेतल्या. तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांच्या हस्ते स्टार स्टुडंट्स अवॉर्ड देण्यात आला या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री.पांडुरंगजी चांडक, प्राचार्या सौ.सारिका बजाज जगदीश चांडक,ऐश्वर्या चांडक ,तसेच संस्थेचे पदाधिकारी श्री. प्रभाकर शेटे श्री.अण्णासाहेब तौर,भगवान लाटे वसंत पाटील कैलास एलशेट्टी इत्यादी उपस्थित होते.या कार्यक्रमाची सांगता शाळेचे सहशिक्षक श्री.आशिष सर यांनी ''माझी आई '' यावर सुंदर असे गाणं सादर केले व शेवटी संस्थेच्या वतीने सचिन गायकवाड यांनी आभार व्यक्त केले.

## शंकर आणणा दराडे यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी



माजलगाव तालुक्यातील घळाटवाडी येथील प्रतिष्ठीत नागरिक व पत्रकार नूज पेपर डिजाईनर अंगद दराडे व महाराष्ट्र मुबंई पोलीस ओमप्रकाश दराडे,. संभाजी दराडे यांचे वडिल शंकर अण्णा दराडे यांचे गुरुवारी सकाळी ९ वाजता निधन झाले. ते ५२ वर्षांचे होते. त्यांच्या मागे ३ मुले, १ मुली, जावई, सुना, नातवंडे माझी सरपंच सुखदेव ( माणिक )दराडे बंधू सह दोन पुतणे सुना, नातवंडे असा त्यांचा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी गुरुवारी दुपारी घळाटवाडी येथे करण्यात आला.

## सम्यक विद्यार्थी आंदोलन बीडच्या वतीने सम्यक संवाद मेळावा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांसाठी व युवकांसाठी घेवून येत आहोत, विद्यार्थ्यांच्या आपल्या पुढील भविष्यासाठी येणारी आवाहने संकटे व त्यावर उपाययोजना यासाठी सम्यक विद्यार्थी आंदोलन बीडजिल्हाच्या वतीने सम्यक संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे.या मेळाव्यास प्रा.अंजलीताई आंबेडकर,एड. सर्वजित बनसोडे यांचे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान सम्यक विद्यार्थी आंदोलन बीड जिल्हयाच्या वतीने केले आहे. दि.: ०९ सप्टेबर २०२४, वेळः दु. १२:०० वा. स्थळः हॉटेल ईट ॲण्ड स्टे, अंबाजोगाई, जि. बीड. या ठिकाणी होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा.अंजलीताई आंबेडकर (अध्यक्ष, सल्लागार समिती सम्यक विद्यार्थी आंदोलन) प्रमुख मार्गदर्शक ॲड. सर्वजीत बनसोडे (प्रदेश उपाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी) स्वागताध्यक्षः– प्रशांत बोराडे (प्रदेश प्रवक्ता, सम्यक विद्यार्थी आंदोलन) शैलेश कांबळे ( जिल्हा अध्यक्ष, वं.ब.आ ) प्रमुख उपस्थिती:– सर्फराज पठाण (राज्य प्रवक्ते), अक्रम खान ( राज्य प्रवक्ते),बाबुराव मस्के ( युवा जिल्हा अध्यक्ष ) उपस्थित राहणार आहेत.याचे आयोजन निमंत्रक : ब्रिजेश इंगळे, रोहन मगर, नितीन सरवदे, स्वप्नील ओव्हाळ, गोविंद म्हस्के मुख्य संयोजन समिती :– निखिल भागवत, संकेत हातागळे, नितीन गोरे, उमेश गोरे, रोहन लांडगे, प्रितम बचुटे, ओमकार भोसले, रोहन जोगदंड, किरण राठोड, प्रमोद निकाळजे, प्रदिप शिंदे, अजय गायकवाड, प्रदिप फंदे, शुभम बचुटे यांच्यासह वंचित बहुजन आघाडी, युवा आघाडी, महीला आघाडी भारतीय बौद्ध महासभा, फुले आंबेडकर विद्वत सभा, वंचित माथाडी व कामगार युनियन यांनी केले आहे.

## प्रधानमंत्री जिवन ज्योती योजना अंतर्गत मयताच्या वारसाला दोन लाखाची मदत

घाटनांदुर प्रतिनिधी :– अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक येथे प्रधानमंत्री जीवन ज्योती योजनेअंतर्गत



मयत व्यक्ती रुकसानाबी शब्बीर सय्यद चोथेवाडी येथील रहिवासी असून यांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती अंतर्गत योजनेचा लाभ घेतला होता ही पॉलिसी वर्षाला ४३६ रुपयाची आहे हे पॉलिसी त्यांनी काढली होती पॉलिसी काढण्यापासून पुढे एक महिन्यानंतर पॉलिसीधारकाचा त्या व्यक्तीचा मृत्यू कुठल्याही कारणाने झाल्यास त्या व्यक्तीच्या वारसाला दोन लाख रुपये मिळतात रुकसानबी सय्यद यांनी या योजनेचा लाभ घेतला होता परंतु त्यांचे निधन झाल्यामुळे त्यांचा मुलगा गौस्मिया शिबिर सय्यद वारसा प्रमाणे महाराष्ट्र बँक शाखा घाटनांदुर यांच्या कडून दोन लाखाची मदत मिळाली यावेळी दोन लाखाचा चेक देताना शाखा व्यवस्थापक विश्वजीत पाटील, कपिल जोशी ,शिरीष टाटर, वैजनाथ नागरगोजे ,कल्याण जाधव आदी उपस्थित होते.

पान ६ वरून...

### गंगामसला मंडळात

पिकांची पहाणी करण्याची गळ अधिकाऱ्यांना घालत होते,अक्षरशः सगळया शेतकऱ्यांचे चेहरे पांढरे पडले असून या झालेल्या नुकसानीचे काय करावे या चिंतेत अधिकाऱ्यांच्या पाहाणीच्या वेळी सगळा गलकाच होता. यावेळी गावातील बाबुराव वराडे, उत्तमराव मारगुडे,अंगद खेत्री,संभाजी पास्टे,पत्रकार राजाभाऊ पास्टे, जगन्नाथ खेत्री, गजानन गोंडे, गणेश सर्जे,अशोक रासवे, नरेंद्र खेत्री,आदित्य गोंडे, सुदर्शन हिवरकर,भगवान रोकडे,अरुण इके,चक्रधर हिवरकर,गोरख रासवे, नामदेव चव्हाण, रोहित नावडकर यांच्यासह अनेक शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

### बापू शिंदे यांची बीड भारत

तथा उपशिक्षणाधिकारी मोहन काकडे, सुधाकर यादव, तुकाराम पवार,श्रीमती अनिता जोगदंड ,श्रीमती वंदना हिरे, गणेश वाघ,उमाकांत चाटे,ज्ञानेश्वर, काझी, यांच्या हस्ते त्यांचा नियूक्तीपत्र, देऊन त्यांना सत्कारित करण्यात आले. बापू शिंदे हे आष्टा शाळेवर सहशिक्षक म्हणून कार्यरत असून त्यांनी स्काऊटचे अनेक उपक्रम पुसरा शाळेवर राबवले आहेत. हिमालय वूड बँजचे प्रशिक्षण त्यांनी मध्य प्रदेश येथील पंचमढी येथे पूर्ण केलेले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल माजी राज्यमंत्री सुरेश धस,आष्टीचे गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, विस्तार धिकारी मनोरंजन धस, अर्जुन गुंड,शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन मारुती पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे,सचिव महेशकुमार शिंदे,संचालक आप्पासाहेब कळे,चंद्रशेखर खाडे, प्रविण मेहरकर,आष्टा गटाचे अमर निंबाळकर,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ,संजय पठाडे,उपाध्यक्ष साईनाथ गळगटे व सर्व सदस्य ,आष्टा गावच्या सरपंच दैवशाला गणेश माळवे, उपसरपंच रूपाली वैभव पठाडे, शाळेचे मुख्याध्यापक मच्छिंद्रनाथ जगताप,मातकुळी केंद्राचे केंद्रप्रमूख धर्मराज शिंदे, शिक्षक रघुनाथ मुटकुळे,नामदेव भिसे,श्रीरंग खोकले,भागवत राजेंद्र,धुमाळ मधुकर, उमेश झांबरे,बांगर सुभाष ,बळे लालासाहेब, दिगंबर आष्टेकर,वाळके सोमनाथ, पवार तुषार, अष्टेकर दिगंबर, डॉ.अनिता चव्हाण,गवळी द्रौपदी ,जाधव सुषमा, नाईकनवरे मनीषा, सेवक सुराणा स्वरूपचंद ,काळे शोभा,महादेव आमले, नवनाथ भोरे यांच्यासह अनेक शिक्षक मित्रांनी फोनवरून, व्हॉट्स अँपच्या माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव व कौतुक करून अभिनंदन केले जात आहे.

### गणेशोत्सव शांततेत पारा पाडा,

तर नाहीच आणि लावला तर विसर्जनानंतर डीजे पोलीस ठाण्यात कार्यवाहीसाठी असेल.

मिरवणूक लवकर काढा व विहित वेळेचे बंधन पाळा मिरवणूक मार्गावर गणपती मंडळांनी परस्पर सलोखा ठेवा. विसर्जन कालावधी पोलीस ठाणे स्तरावर वाढून मिळणार नाही वरिष्ठाकडून परवानगी आणावी लागेल असे स्पष्ट करण्यात आले.

### शिक्षकांच्या समस्या शासनाकडे

याप्रसंगी मा.आ.डी.के.देशमुख यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्था,छत्रपती संभाजीनगरच्या अध्यक्षपदी निवडीबद्दल संस्थेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी प्रतिवर्षी प्रमाणे नवविकास मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व्यासपीठावरून खाली उतरून सर्व शिक्षकां जवळ जावून खादीचा रुमाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा शिक्षकदिना निमित्त गौरव केला.

सर्व मान्यवरांनी यावेळी समयोचित मार्गदर्शन केले तसेच शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक ए.आर.इबिते,आभार एस.एस.देशमुख तर सूत्रसंचालन एच.पी.देशमुख यांनी केले,कार्यक्रमास सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

### अंबाजोगाईत संत शिरोमणी

नाभिक समाज संघटन करण्याचे कौतुकास्पद कार्य करीत आहेत. त्यामुळे श्री संत शिरोमणी सेना महाराजांचे विचार हे पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविले जात आहेत. हे अभिनंदनिय आहे. म्हणून अशा अध्यात्मिक, धार्मिक उपक्रमांची नितांत आवश्यकता आहे. अंबाजोगाईत खऱ्या अर्थाने संत शिरोमणी सेना महाराजांच्या विचारांचा जागर सुरू असल्याचे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष मोदी यांनी केले. यावेळी नाभिक एकता कर्मचारी महासंघाचे शहराध्यक्ष रघुनाथ राऊत, नाभिक एकता महासंघ शहराध्यक्ष अजिंक्य राऊत, एकता नाभिक महासंघ महिला आघाडीच्या पुष्पाताई कचरे, राजेभाऊ जाधव, श्रीरंग सुरवसे, डॉ.कमलाकर राऊत, विठ्ठल मोटेगावकर, केशव राऊत, दादा चोपडे, माऊली चोपडे, विलास काळे, लक्ष्मण राऊत, सावंत सर, बालाजी कचरे, अशोक शिंदे, अमोल माने, विष्णू कचरे, पांडुरंग कचरे, महादेव कांबळे, माणिक राऊत, ओम गवळी, श्रीकांत घोडके, भाऊसाहेब गवळी, सचिन शिंदे, श्रीहरी गवळी, अमित चव्हाण, जीवन गवळी, नाथराव गवळी, बाळू कोथळे, प्रवीण सुरवसे, विजय गवळी, नवनाथ सुरवसे, दत्ता काळे, बालाजी कांबळे, महेश कचरे, वैभव राऊत, डी.के.कचरे, सुरज कचरे, आर.के.कचरे, जगन्नाथ बिडवे, हनुमंत वाघमारे, अभिषेक सुरवसे, नितीन गवळी, योगेश गायकवाड, लिंबराज गवळी, योगेश काळे, श्रीनिवास कचरे, गणेश राऊत, संतोष कचरे, उमेश दळवी, भागवत राऊत, अमृत मोटेगावकर, दादासाहेब सावंत, दिगंबर माने, चंद्रकांत सुरवसे, रवी लोखंडे, बाबुराव घोडके, पुरूषोत्तम कचरे, विनायक गायकवाड, बालाजी गायकवाड, ऋषिकेश मोरे, संभाजी राऊत, रवी काळे, ओम सावंत, दत्ता गोरे, सुभाष राऊत, शुभम कचरे, दिलीप सुर्यवंशी, मोहन सुर्यवंशी, पिंटू सुरवसे, गणेश काशिंदे, दिलीप कांबळे, बाबुराव कांबळे, बालाजी वाघमारे, राम राऊत, बालाजी हरणे, कविराज कचरे, दिपक सुरवसे, दिलीप माने, कल्याण कांबळे, किर्तन गवळी आदींसह समाज बांधव, महिला भगिनी व युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक तालुकाध्यक्ष मधुकर सुरवसे यांनी केले. तर सुत्रसंचालन डॉ.केशव राऊत यांनी करून उपस्थितांचे आभार अनंत मोहिते यांनी मानले.

### लोकनेते मुंडे साहेबांनी जनतेसाठी

राहाता पंचायत समितीसाठी देखील तेंव्हा प्रशासकीय इमारत मंजूर करण्यात आली होती. आज या इमारतीने मूर्त स्वरूप धारण केले आहे. तालुक्यातील शेतकरी, सर्वसामान्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या या प्रशस्त आणि सर्व सुविधायुक्त इमारतीचे आज माझ्या हस्ते लोकार्पण करण्यात आले याचा मला आनंद होत आहे. पदावर असताना केवळ इमारती न बांधता माणसं जोडण्याचे काम आम्ही केले असं त्या म्हणाल्या.

## आत्मा, इंद्रिये व मनाची प्रसन्नता साध्य केल्यास उत्तम आरोग्य लाभते –डॉ. संगीता देशपांडे

**पाटोदा । प्रतिनिधी**

आरोग्य हाच संतुलित आहाराचा एकमेव हेतू असून प्रसन्न आत्मा, प्रसन्न इंद्रिये व प्रसन्न मन राहिल्यास पर्यायी माणसाला सर्वांगीण आरोग्य लाभते असे प्रतिपादन बीडच्या व्यंकटेश हॉस्पिटलच्या आहार विशेषज्ञ डॉ. संगीता सुहास देशपांडे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या कर्मचारी कल्याण समिती व वनस्पतीशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने ६ सप्टेंबर रोजी आयोजित कर्मचारी उद्बोधनपर व्याख्यानात त्या अतिथी व्याख्याता म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे, पदव्युत्तर विभाग संचालक प्रो. गणेश पाचकोरे, क. म. उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण उपस्थित होते. प्रास्ताविक व अतिथी वक्त्यांचा परिचय प्रो. गणेश पाचकोरे यांनी करून दिला.

'दैनंदिन जीवनात संतुलित आहाराचे महत्व' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. संगीता देशपांडे पुढे म्हणाल्या की, आजकाल चायनीज फूड, साऊथ इंडियन, पंजाबी व इतर प्रकारच्या खाद्यपदार्थांना अधिक पसंत केल्यामुळे आपण आपला मूळचा मराठमोळा आहार विसरत चाललो आहोत. पारंपरिक महाराष्ट्रीयन आहार हा संतुलित व सर्वंकष असल्यामुळे तो किमान ६०% प्रमाणात तरी घेणे गरजेचे आहे. आहाराचे स्वरूप अथवा नमुना हा व्यक्तिपरत्वे वेगवेगळा असतो. सध्याच्या आहारपद्धतीमुळे शरीरात जास्तीच्या कॅलरी घेतल्या जातात मात्र त्यातून योग्य पोषण होत नाही. यातूनच स्थौल्य व इतर आजार उद्भवतात. संतुलित आहाराचे महत्व स्पष्ट करताना त्या म्हणाल्या की, तजेलदार मनस्थिती राहणे, कार्यक्षमता टिकून राहणे, वजन नियंत्रित ठेवणे, रोगप्रतिकारशक्ती वाढवणे व शारीरिक व मानसिक आरोग्य टिकवणे यासाठी संतुलित आहार घेणे जरुरी आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शरद पवार यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. दिलीप गिऱ्हे यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करणारी यंत्रणा तयार होणे गरजेचे – डॉ. विक्रम सारुक

पाटोदा । प्रतिनिधी

देशात विकासासाठी अनेक संसाधने उपलब्ध आहेत परंतु त्यांचा योग्य व प्रभावीपणे वापर करणारी यंत्रणा तयार झाल्याशिवाय देशाचा खरा विकास साध्य होणार नाही असे प्रतिपादन अंबाजोगाई स्थित शालेय शिक्षण विभागातील महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग– अ अधिकारी डॉ. विक्रम सारुक यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ५ सप्टेंबर रोजी शिक्षकदिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक प्रो. गणेश पाचकोरे, क. म. उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड उपस्थित होते. प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व संत शिरोमणी मन्मथस्वामी यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमांचे पूजन व पुष्पमाल्यार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात कु. श्रेया नेमाने, सायली बोराटे, अश्विनी पंखाडे, सुप्रिया गर्जे, श्रद्धा शेवाळे, सुविधा



पवार या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या स्वागतगीताने झाली.

शिक्षकदिनानिमित्त कु. पल्लवी गिरी, श्रद्धा शेवाळे, सुप्रिया गर्जे, अंकिता भवर, आरती देवकर, मयुरी बहिर या विद्यार्थिनींनी मनोगते व्यक्त केली. यानंतर विद्यार्थ्यांनी कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील प्राध्यापकांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार केला. शिक्षकदिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या 'ध्यास' या वार्षिकांकाचे प्रकाशन करण्यात आले. मराठी विभागाच्या 'मृदगंध' व हिंदी विभागाच्या 'संवेदना' या भित्तिपत्रकांचेही प्रकाशन अतिथींच्या हस्ते करण्यात आले.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. विक्रम सारुक पुढे म्हणाले की, भारताच्या मातीतील अनेक माणसांनी आपल्या प्रतिभेच्या बळावर जगाच्या पाठीवर अनेक देशांमध्ये नावलौकिक मिळवून प्रतिष्ठा प्राप्त केलेली आहे. माणसाने आपल्या क्षमतेचा पूर्ण वापर करून मनाचा दृढनिश्चय केल्यास जगात काहीही साध्य करता येते. शिक्षक हे एक राष्ट्रीय संपत्ती असून भावी पिढीला योग्य दिशा देणे व आदर्श नागरिक घडविणे हे त्यांचे कर्तव्य आहे. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रो. हांगे म्हणाले की, कमी शिक्षित परंतु उत्तम कौशल्यप्राप्त युवकांना देखील विदेशात अनेक कामांची संधी उपलब्ध झालेली आहे. अशा संधी प्राप्त करून युवक आपले उज्ज्वल भवितव्य घडवू शकतात. सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले. अतिथी परिचय व प्रास्ताविक प्रा. शरद पवार यांनी केले. प्रकाशन सोहळ्याचे संचालन डॉ. न. पु. काळे यांनी केले तर आभार प्रा. मनिषा गाढवे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

cmyk

# नगर जिल्ह्यातील तरुण शेतकऱ्यांना मोफत ड्रोन प्रशिक्षण

नगर : शेतीत नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून तरुण शेतकऱ्यांनी शेती करावी यासाठी तरुण शेतकऱ्यांना ड्रोन चालवण्यासह अन्य बाबींच्या माहिती मोफत प्रशिक्षण देण्यात आले आहे. कृषी विकास संस्था आणि माफाउंडेशनच्या या उपक्रमाला जिल्हाभरातून चांगला प्रतिसाद मिळाला.

पारंपरिक शेती करण्याऐवजी आता तांत्रिक, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करावी यासाठी सरकारी पातळीवर अवाहन केले जाते. शेतीत फवारणी व अन्य बाबीसाठी ड्रोनचा वापर महत्त्वाचा मानला जात असून त्यासाठी तरुण शेतकऱ्यांना प्रशिक्षणातून पूरक माहिती मिळावी यासाठी कृषी विकास संस्था आणि माफाऊंडेशनकडून मोफत ड्रोन प्रशिक्षण देण्यात आले. या वेळी झालेल्या कार्यक्रमाला म.हात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ. जी. के. ससाणे, कृषी अवजारे संशोधन विभागाचे प्रमुख डॉ. तुळशीदास बास्टेवाड, मकरंद कोरडे, आदीनाथ चंद्रेपाटील यांच्यासह इतर उपस्थित होते.



महाफाऊंडेशनचे संचालक ओंकार आगळे पाटील उपक्रमाची माहिती दिली. या वेळी ग्रामीण भागातील तरुणांना नावीन्यपूर्ण मार्गाने रोजगाराची उपलब्धता करून देण्यासाठी महाफाऊंडेशन काम करत असून, आगामी काळात प्रत्येक गावात एक तरुण कृषी ड्रोन उद्योजक तयार करण्याचे संस्थेचे उद्दिष्ट आहे.

या माध्यमातून गावागावांतील शेतकऱ्यांना फवारणीचे ओझे वाटू नये, रासायनिक औषंधापासून शेतकऱ्यांच्या आरोग्याचे रक्षण करणे व कमी वेळात आणि योग्य वेळी पिकांना फवारणी देऊन उत्पादन क्षमता वाढवावी असे तरुण शेतकऱ्यांना अवाहन केले.कोपरगाव येथील प्रगतिशील शेतकरी संतोष शिंदे, नेवासा येथील संदीप शेंडे, लक्ष्मण बर्डे यांनी उपस्थित युवा शेतकऱ्यांना कृषी ड्रोन व ड्रोन फवारणी व्यवसायाच्या माध्यमातून उद्योजकता बाबत माहिती दिली. ड्रोन व्यवसायाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पीक फवारणीची सेवा देऊन महिन्याकाठी १ ते १.५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळत असल्याचा अनुभव नेवासा येथील विशाल करडक यांनी ग्रामीण भागातील युवकांनी स्वयंरोजगारासाठी ड्रोन फवारणी व्यवसाय सुरु करण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन कृष्णा बेलगावकर यांनी केले तर आदिनाथ चंद्रे पाटील यांनी आभार मानले.

## पीक नुकसान नोंदविण्यासाठीचे टोल फ्री क्रमांक सातत्याने व्यस्त




पुणे : या आठवड्यात सातत्याने झालेल्या जोरदार पावसामुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. आता पीकविमा कंपन्यांकडून पीक नुकसानीच्या पूर्वसूचना ७२ तासांच्या आत देण्याबाबत आवाहन केले जात आहे. मात्र, याठिकाणीही शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत असून कंपन्यांचे टोल फ्री क्रमांक सातत्याने व्यस्त, तर कधी ऑऊट ऑफ कव्हरेज मिळत असल्याच्या तक्रारी येत आहेत.या खरीप हंगामाला सततच्या पावसाने मोठा फटका दिला आहे. या आठवड्यात सर्वत्र जोरदार पाऊस कोसळला. या पावसाने सोयाबीन, कपाशी, मूग, उडीद, तूर अशा विविध खरीप पिकांचे नुकसान केले आहे.

आता पाऊस ओसरला तरी अनेक भागात सखल ठिकाणी पिके पाण्यात आहेत. मूळकुज वाढली. पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकरी पीकविमा कंपन्यांकडे पूर्वसूचनेसाठी धाव घेत आहेत. कंपन्यांकडून शेतकऱ्यांसाठी टोल फ्री क्रमांक दिल्याचे जाहीर केले आहे. शिवाय ॲपचा वापर करण्याचा सल्ला दिला जात आहे. याही ठिकाणी शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागते आहे. टोल फ्री क्रमांक सातत्याने व्यस्त येत आहेत. तर अनेकवेळा आऊट ऑफ कव्हरेज असल्याचा संदेश मिळतो. यात सुधारणा होण्याची गरज आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित ऊस तोडणी कार्यक्रम सादर करणारी महिंद्रा ठरली पहिली कंपनी!

पुणे : आता कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानाच्या आधारे ऊस तोडणी करता येणार आहे. एसएम शंकरराव कोल्हे एसएसके साखर कारखान्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित ऊस तोडणी कार्यक्रम सादर करणारी महिंद्रा ही पहिली कंपनी ठरली आहे. हे तंत्रज्ञान महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, तामिळनाडू आणि हरियाणामधील १ लाख एकर जमिनीवर तैनात केले आहे.

देशातील साखर उद्योगासाठी साखर-प्रमाण-आधारित उसाची तोडणी करणाऱ्या कंपनीमध्ये महिंद्रा अँड महिंद्रा अग्रणी आहे. आता एआय आधारित ऊस तोडणी कार्यक्रम ऑफर करणारी देशातील पहिली कंपनी बनली आहे. अहमदनगर जिल्ह्यातील सहकार महर्षी शंकरराव कोल्हे एसएसके लिमिटेड या कंपनीने ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. सहकार महर्षी शंकरराव कोल्हे यांच्या अंतर्गत २०२४ च्या गाळप हंगामात संपूर्ण नोंदणीकृत ऊस क्षेत्रासाठी तैनात केलेले, एआय-आधारित तंत्रज्ञान ऊस पिकांच्या वेळेवर काढणीसाठी आणि साखरेच्या अचूक अंदाज देण्यासाठी सक्षम आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता ऍप्लिकेशन्स शेतीसाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकतात आणि अनेक फायदे देऊ शकतात. ऊस लागवडीखालील शेतजमिनीवर तंत्रज्ञान ऊस तोडणीची अचूक वेळ आणि योग्य साखरेचे प्रमाण जाणून घेण्यासाठी महत्वाचे ठरते, त्यामुळे जास्तीत जास्त उत्पादन मिळू शकते. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून, शेती करण्याच्या पद्धतीत परिवर्तन घडवून आणण्याचे आमचे उद्दिष्ट आहे असे महिंद्रा कंपनीतर्फे सांगण्यात आले.

कोल्हे साखर कारखाना भारतातील पहिली कंपनी आहे ज्याने एआय-आधारित कापणी तंत्रज्ञान लागू केले आहे. त्यांनी तीन वर्षांपूर्वी ३,००० एकर जमिनीवर एक पथदर्शी प्रकल्प राबवला, परिणामी त्यांचा नफा वाढला आणि साखरेचा उतारा सुद्धा जास्त मिळाला. त्या निकालांच्या आधारे, या वर्षी पुन्हा महिंद्रासोबत करार करण्याचे कोल्हे साखर कारखाना यांनी ठरवले आहे आणि त्यांच्या संपूर्ण पाणलोट क्षेत्रात हे तंत्रज्ञान लागू करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. ऊस तोडणीत क्रांती घडवण्याच्या ध्येयाने, महिंद्राने विविध ऊस कारखान्यांसोबत चार वर्षांहून अधिक काळ काम केले आहे. या क्रांतिकारी तंत्रज्ञानामुळे भारतातील साखर कारखानदारांना आणि भारतीय शेतकऱ्यांना दीर्घकालीन फायदा होण्याची क्षमता आहे.




# कमी खर्चात अधिक नफा देणारा कृषीवर आधारीत सुकामेवा व्यवसाय

सुकामेवा किंवा वाळलेल्या फळांचा व्यवसाय हा उच्च-नफ्याच्या मार्जिनसह आणि कमी स्टार्टअप खर्चासह करता येणारा व्यवसाय आहे. आरोग्यपूर्ण, सोयीस्कर व झटपट उपलब्ध होणाऱ्या स्नॅक्सची वाढती मागणी पूर्ण करणारा हा व्यवसाय तुम्हाला फायदेशीर संधी देतो. गुणवत्ता, टिकवणक्षमता आणि नावीन्यपूर्णता यावर लक्ष केंद्रित करून उद्योजक या व्यवसायातून चांगला नफा मिळवू शकतात. नवीन उद्योजकांसाठी हा व्यवसाय एक सुवर्णसंधी आहे.

सध्या अधिकाधिक लोक आरोग्य आणि निरोगीपणाला प्राधान्य देत असल्याने पौष्टिक, सोयीस्कर स्नॅक्सची मागणी झपाट्याने वाढत आहे. अत्यावश्यक पोषक घटकांनी युक्त आणि दीर्घकाळ टिकणारा सुकामेवा, हे शुगरफ्री आरोग्यदायी पर्याय शोधणाऱ्या ग्राहकांच्या पसंतीस उतरत आहेत. सुकामेवा उद्योग हा ट्रेंड केवळ काही काळासाठी असलेला फॅड नाही, तर निरोगी खाद्य संस्कृतीच्या दिशेने व्यापक चळवळीचा एक भाग आहे. जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबरने समृद्ध, जर्दाळू, मनुका, अंजीर आणि खजूर यांसारखी सुकी फळे साखरयुक्त स्नॅक्ससाठी पोषक पर्याय म्हणून पाहिली जातात. २०२३ ते २०३० पर्यंत ७.२ टक्के वार्षिक वृद्धी दराने सुकामेव्याच्या व्यवसाय वाढणार आहे. बाजारपेठेसह, हा कल कायम राहण्याची अपेक्षा आहे.

नफा मार्जिन आणि बाजार संधी : सुकामेव्याच्या व्यवसायातील प्रमुख आकर्षण म्हणजे उच्च-नफा मार्जिनची क्षमता. सुका मेवा सामान्यत: ताज्या फळांपेक्षा जास्त किंमती देतात कारण प्रक्रिया, पॅकेजिंग आणि ते देत असलेल्या सोयीमुळे. उदाहरणार्थ, एक किलो ताजे आंबे



काही रुपयांना विकले जाऊ शकतात, परंतु वाळलेल्या आंब्याचे तुकडे म्हणून प्रक्रिया करून पॅक केल्यावर त्याची किंमत सहजतेने वाढू शकते. शिवाय, सुकामेवा उद्योग बाजाराच्या विविध संधी देतो. उद्योजक सेंद्रिय बाजारपेठेसह विविध विभागांना लक्ष्य करू शकतात, जेथे ग्राहक कीटकनाशक-मुक्त उत्पादनांसाठी प्रीमियम किंमत मोजण्यास तयार असतात. याव्यतिरिक्त, वाळलेल्या फळांचा वापर अन्न उद्योगात तृणधान्ये, भाजलेले धान्य आणि ट्रेल मिक्समधील घटक म्हणून मोठ्या प्रमाणात केला जातो. म्हणजेच वैयक्तिक ग्राहकांच्या पलीकडेही या व्यवसायाची बाजारपेठ विस्तारली जाते.

कमी स्टार्टअप खर्च :इतर अन्न प्रक्रिया उद्योगांच्या तुलनेत सुकामेव्याचा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रारंभिक गुंतवणूक तुलनेने कमी आहे. मूलभूत गरजांमध्ये दर्जेदार ताजी फळे, निर्जलीकरण उपकरणे, पॅकेजिंग साहित्य आणि वितरण धोरण यांचा समावेश होतो. हा व्यवसाय माफक बजेटमध्ये केला जाऊ शकतो, ज्यामुळे लहान-उद्योजकांसाठी आदर्श आहे. हळूहळू या व्यवसायाची व्याप्ती वाढवता येते. उद्योजक लहान व्यवसाय सुरु करून स्थानिक शेतकऱ्यांच्या बाजारात किंवा ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर विक्री करू शकतात आणि हळूहळू किराणा दुकाने पुरवण्यासाठी किंवा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निर्यात करण्यासाठी विस्तार करू शकतात. जसजसा व्यवसाय वाढतो, तसतसे सुकविण्याचे आणि पॅकेजिंगसाठी प्रगत तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक केल्याने कार्यक्षमता आणि नफा आणखी वाढू शकतो.

टिकाऊ व्यवसाय :सुकामेव्याचा व्यवसाय टिकाऊ उत्पादनांसाठी वाढत्या ग्राहकांच्या पसंतीशी जुळवून घेतो. अन्नाचा अपव्यय कमी करून, वाळवण्यामुळे फळांचे शेल्फ लाइफ वाढते जे अन्यथा खराब होणार असते. या व्यवसायामार्फत स्थानिक शेतकरी किंवा वाजवी-व्यापार पुरवठादारांकडून फळे मिळविता येईल. ज्यामुळे सामाजिक दृष्टीने जागरूक ग्राहकांना ब्रँडचे आकर्षण अधिक वाढते.

व्यवसायातील आव्हाने : सुकामेव्याचा व्यवसाय आश्वासक असला तरी तो आव्हानांशिवाय नाही. उद्योजकांनी गुणवत्ता नियंत्रण, विश्वासार्ह पुरवठादार सोर्सिंग आणि अन्न सुरक्षा नियमांमध्ये नेव्हिगेट करणे यासारख्या घटकांचा विचार केला पाहिजे. सातत्यपूर्ण गुणवत्ता राखणे महत्वाचे आहे, कारण वाळलेल्या फळांची चव, पोत आणि स्वरूप बदलू शकते. शिवाय, बाजारपेठेतील स्पर्धा तीव्र असू शकते, ज्यामुळे व्यवसायांना त्यांची उत्पादने ब्रँडिंग, पॅकेजिंग किंवा विदेशी आणि नाविन्यपूर्ण फ्लेवर्सद्वारे वेगळी दाखविणे आवश्यक आहे. खाद्य उद्योगात प्रवेश करू पाहणाऱ्या उद्योजकांसाठी सुकामेव्याचा व्यवसाय फायदेशीर संधी देतो. निरोगी स्नॅक्सची वाढती मागणी, उच्च-नफा मार्जिनची क्षमता आणि तुलनेने कमी स्टार्टअप खर्चासह, हा व्यवसाय नवीन उद्योजकांसाठी योग्य आहे.




### महत्वाच्या घटना

१५२२ : फर्डिनांड मॅगेलनच्या मोहिमेतील व्हिक्टोरिया हे जगप्रदक्षिणा करणारे पहिले जहाज स्पेनला पोहोचले.
१८८८ : चार्ल्स टर्नरचा एकाच मोसमात २५० क्रिकेट बळीचा विक्रम.
१९३९ : दुसरे महायुद्ध दक्षिण अफ्रिकेने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९५२ : कॅनडातील पहिले दूरचित्रवाणी केन्द्र मॉंट्रिअल येथे सुरू झाले.
१९६५ : पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल अयुब खान यांनी भारताविरुद्ध युद्ध पुकारले. 'ऑपरेशन ग्रॅंड स्लॅम' ही त्यांची दिल्लीपर्यंत धडक मारण्याची योजना होती. पॅटन रणगाडे आणि सेबरजेट विमाने असलेल्या पाकिस्तानच्या घुसखोरीला प्रत्युत्तर देत भारताने पाकिस्तानवर हल्ला चढवला व पहिल्या भारत पाकिस्तान युद्धाची सुरूवात झाली. या युद्धात भारताने पाकिस्तानला सपाटून मार दिला.
१९६६ : दक्षिण अफ्रिकेचे पंतप्रधान हेन्ड्रिक व्हरवोअर्ड यांची संसदीय बैठक चालू असतानाच भोसकुन हत्या.
१९६८ : स्वाझीलॅंड हा देश स्वतंत्र झाला.
१९९३ : ज्येष्ठ कवी गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर यांची कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या जनस्थान पुरस्कारासाठी निवड
१९९७ : अमेरिकेतील 'नॅशनल एन्डाऊमेंट फॉर द आर्टस' या संस्थेतर्फे विख्यात सरोदवादक अमजद अली खाँ यांची 'नॅशनल हेरिटेजफेलोशिप'साठी निवड
२००८ : डी. सुब्बाराव यांची भारतीय रिजर्व बॅंकेच्या गव्हर्नरपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांनी ६ सप्टेबर पासून आपला पदभार सांभाळला.
२०१९ : भारतीय क्रिकेटपटू ऋषभ पंत कसोटी क्रिकेट सामन्यात सर्वात पहिले ५० गाडी बाद करण्याचा विक्रम आपल्या नावे करणरे पहिले यष्टीरक्षक बनले.
२०१९ : आपत्ती व्यवस्थापनेबद्दल आयोजित '' एक्सिलेंस अवार्ड'' ओडिसा राज्याने जिंकला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७६६ : जॉन डाल्टन इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २७ जुलै १८४४)
१८८९ : बॅ. शरदचंद्र बोस स्वांत्र्यसेनानी, झुंजार पत्रकार, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे वडील बंधू (मृत्यू: २० फेब्रुवारी १९५०)
१८९२ : नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ सर एडवर्ड ऍपलटन यांचा जन्म.
१९०१ : कमलाबाई कामत तथा कमलाबाई रघुनाथ गोखले भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या स्त्री कलाकार. 'राजा हरिश्चंद्र' या पहिल्या मूकपटात त्यांनी भूमिका केली होती. त्यांचे चिरंजीव चंद्रकांत गोखले व नातू विक्रम गोखले अशा तीन पिढ्यांनी अभिनय क्षेत्र गाजवले. (मृत्यू: १८ मे १९९७)
१९२१ : बार-कोड चे सहसंशोधक नॉर्मन जोसेफ व्हाउडलॅंड यांचा जन्म. (मृत्यू: ९ सप्टेंबर २०१२)
१९२३ : युगोस्लाव्हियाचे राजा पीटर (दुसरा) यांचा जन्म.
१९२९ : यश जोहर हिन्दी चित्रपट निर्माता (मृत्यू: २६ जून २००४)
१९५७ : पोर्तुगालचे पंतप्रधान जोशे सॉक्रेटिस यांचा जन्म.
१९६८ : सईद अन्वर पाकिस्तानी डावखुरा फलंदाज व कप्तान. आपल्या पदार्पणाच्या कसोटी सामन्यात तो दोन्ही डावांत शून्य धावांवर बाद झाला होता. आपल्या पहिल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यातही त्याने केवळ ३ धावा केल्या होत्या. मात्र नंतर त्याची कामगिरी एकदमच बहारदार झाली. एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांत सलग तीन शतके झळकावणाऱ्या मोजक्या खेळाडूंमध्ये त्याचा समावेश होतो.
१९७१ : भारतीय क्रिकेट खेळाडू देवांग गांधी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०७ : नोबल पारितोषिक विजेता प्रख्यात फ्रेंच कवी आणि निबंधलेखक सुल्ली प्रुडहोमी यांचे निधन.
१९३८ : नोबेल पारितोषिक विजेते फ्रेंच लेखक सली प्रुडहॉम यांचे निधन.
१९६३ : मंजेश्वर गोविंद पै तथा राष्ट्रकवी गोविंद पै कन्नड कवी व श्रेष्ठ भाषा संशोधक, इतिहास व तत्त्वज्ञानाचे व्यासंगी, त्यांना कन्नड, कोंकणी, इंग्लिश, तुळू, संस्कृत, तेलुगू, तामिळ, मराठी, कन्नड, बंगाली, पर्शियन, पाली, ऊर्दू, ग्रीक, जपानी इ. २५ भाषा अस्खलित येत असत. त्यांनी अनेक जपानी ग्रंथांचे कन्नडमध्ये भाषांतर केले. (जन्म: २३ मार्च १८८३)
१९७२ : अल्लाउद्दीन खाँ सरोदवादक व संगीतकार. हिन्दुस्थानी शास्त्रीय संगीतातील महर्षितुल्य कलाकार व संगीतकार. सरोद, व्हायोलिन, बासरी व अन्य अनेक वाद्ये ते तयारीने वाजवत असत. मैहर राजघराण्याचे दरबारी वादक. संगीत नाटक अकादमी पारितोषिक (१९५४), पद्मभूषण (१९५८), पद्मविभूषण (१९७१) इ. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. (जन्म: ? ? १८६२)
१९८६ : सुरेश हरिप्रसाद जोशी आधुनिक गुजराथीतील प्रसिद्ध कवी, कथाकार व समीक्षक. त्यांनी काही भारतीय व परकीय साहित्यकृतींचे गुजराथीत अनुवादही केले. (जन्म: ३० मे १९२१)
१९९० : सर लिओनार्ड तथा 'लेन' हटन इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: २३ जून १९१६)
२००७ : इटालियन ऑपेरा गायक लुसियानो पाव्हारॉटी यांचे निधन.
२००९ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व पंजाब राज्याचे माजी तेरावे मुख्यमंत्री हरचरण सिंह ब्रार यांचे निधन.

# काकू-नानांच्या संस्कारातूनच जयदत्त क्षीरसागर यांनी धार्मिकता जपली-ढोक महाराज

## कितीही लाटा आल्या तरी पैलतीर गाठण्याची शक्ती आमचे दैवत देते-जयदत्त क्षीरसागर

राजुरी । प्रतिनिधी

स्व. काकू-नाना यांच्या काळापासून आपण क्षीरसागर कुटुंबाला ओळखतो काकूंनी सरपंच पदावर असताना नवगण राजुरी या ठिकाणी गणेश जन्मानिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह पंचक्रोशीत वाखाणण्याजोगा केल्ा.तीच परंपरा त्यांची मुलं पुढे नेत आहेत जयदत्त अण्णा सारखा नेता हा त्यांच्याच संस्कारातून पुढे आलेला आहे.धार्मिक कार्यक्रमात प्रचंड अभ्यास आणि आवड असलेला नेता म्हणजे अण्णा आहे असे गौरवोद्गार रामायणाचार्य रामराव ढोक महाराज यांनी व्यक्त केले.



मंगलमूर्ती देवस्थान नवगण राजुरी येथे श्री गणेश जन्मोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या प्रारंभी रामायणाचार्य रामराव ढोक महाराज यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थानचे अध्यक्ष रवींद्र क्षीरसागर आणि हेमंत क्षीरसागर यांच्या नियोजनाखाली सुरू असलेल्या या अखंड हरिनाम सप्ताहात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना रामायणाचार्य ढोक महाराज म्हणाले की, कर्मयोगी स्व.नाना आणि स्व. काकू या दाम्पत्याने नवगण राजुरीत अखंडपणे हा सप्ताह सुरू ठेवला. आजही चाकरवाडी या ठिकाणी जयदत्त अण्णांच्या उपस्थिती नंतरच सप्ताहाची सांगता होती ही परंपरा जपण्याचे भाग्य या कुटुंबाला लाभले आहे. संत आणि समाज यांचा संगम बीड जिल्ह्यात दिसून येतो. जोपर्यंत एखाद्या गोष्टीला महत्त्व असते तोपर्यंत त्याची किंमत असते. जो-तो ठराविक स्थानावर असतो तेव्हा तो मोठा असतो. जो पर्यंत मनुष्य चांगला असतो तेव्हा कोणी येत नाही पण चार-पाच दिवस आजारी असला की भेटीसाठी येतात आणि आग्रहाने खाण्याचा सल्ला देतात. कळो येई अंतकाळी प्राण तया सोडी म्हणजे अंतिम सम येईपर्यंत मनुष्याला परमेश्वराची आठवण होत नाही मात्र अंतसमयी त्याला परमेश्वर आठवतो मनुष्य जगण्यासाठी आयुष्यभर खटपट करतो मात्र अशावेळी परमार्थ विसरतो आणि अंतकाळी परमेश्वर आठवतो यासाठी बालपणापासूनच मुलांवर धार्मिक संस्कार होणे गरजेचे असतात स्व. काकू आणि नानांच्या संस्कारात वाढलेले हे कुटुंब धार्मिक वृत्तीचे आहे त्यात जयदत्त अण्णांसारखा नेता हा बीड जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. उत्तम संस्कारामुळेच जनसेवेसारखे व्रत त्यांच्या अंगी रुजलेले आहे जनतेची सेवा करत करत धार्मिक वृत्ती अंगीकारत जीवन जगणार्याला परमेश्वराचा आशीर्वाद असतो त्यामुळे असा नेता प्रत्येक ठिकाणी गरजेचा असतो असे सांगून त्यांनी घेतलेल्या अभंगाचे विवेचन केले. यावेळी महामंडलेश्वर महंत अमृतदास जोशी महाराज यांच्यासह प्रतिष्ठित नागरिक, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड बालरंगभूमी परिषदेच्या इको फ्रेंडली गणेशमूर्ती कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या पुढाकारातून उपक्रम



बीड । प्रतिनिधी

येथील बालरंगभूमी परिषदेच्या इको फ्रेंडली गणेश मूर्ती बनविण्याच्या कार्यशाळेत ५५ विद्यार्थ्यांनी शाडू मातीच्या गणेशाच्या मूर्ती बनवल्या असून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बालरंगभूमी परिषदेच्या बीड जिल्हाध्यक्ष तथा प्राचार्य डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

के.एस.के.महाविद्यालयाच्या परिसरात गुरुवारी इको फ्रेंडली गणेश मूर्ती, शाडू मातीच्या गणेश मूर्ती बनविण्याची कार्यशाळा झाली. या कार्यशाळेत बीड शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. लहान मुलांच्या सुप्त गुणांना वाव देणे व पर्यावरणपूरक वातावरण तयार करण्यासाठी बीड बालरंगभूमी परिषद विविध उपक्रम सातत्याने राबवत आली आहे. शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनवण्याच्या कार्यशाळेचे मुख्य प्रशिक्षक चित्रकार अमित गाडे होते. त्यांचे सहाय्यक किरण वाघमारे, अजय कांबळे, शितल थोरात, प्रतीक्षा दळवी यांनी प्रशिक्षण दिले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना बालरंगभूमी परिषदेतर्फे सहभाग प्रमाणपत्र डॉ.दीपाताई क्षीरसागर, डॉ.शिवानंद शिरसागर, डॉ.संजय पाटील देवळाणकर, व्ही.टी. देशमाने, सुधाकर गुट्टे, जालिंदर कोळेकर, नारायण काकडे, अन्सर खान यांच्या हस्ते देण्यात आले. या कार्यशाळेसाठी अनिता शिंदे, दीपक जमदाडे, सोनाली शहाणे, विजयकुमार राख, कबीर जाधव, शितल चव्हाण, आकांक्षा डंबाळे, अमन तांगडे, सागर आदींनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात



### आदर्श माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिन

आज दिनांक ५/९/२०२४ रोजी आदर्श माध्यमिक विद्यालय खालापुरी ता. शिरूर जि. बीड येथे शिक्षक दिन साजरा करण्यात आला.... प्रथम विद्येची आराध्य देवता सरस्वती माता व डॉ.. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करून तसेच शिक्षक दिनाचे खरे मानकरी महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांना शिक्षक दिनी कोटी कोटी त्रिवार अभिवादन करून पुढील कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे झाड व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला त्यानंतर काही विद्यार्थ्यांनी शिक्षकांवर आधारीत सुंदर असे भाषण केले. समाजातील प्रत्येक पिढी घडवण्यामध्ये मोलाचा वाटा असणाऱ्या सर्व गुरुवर्यांना शिक्षक दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा.... शाळेतील विद्यार्थ्यांनी आज शिक्षक दिन साजरा केला... सर्व शिक्षकांना संबोधून शि -शिखरापर्यंत नेणाऱ्या क्ष-क्षमता आणि क-कर्तव्यनिष्ठतेने परिपूर्ण अशा सर्व शिक्षकांचा आदर करत आज इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांनी शाळेचे कामकाज सांभाळले त्यांना मार्गदर्शन शाळेचे मुख्याध्यापक सोनसाळे बी. बी. सर व सर्व शाळेतील शिक्षकांनी केले. विद्यार्थ्यांमध्ये मुख्याध्यापिका-वैष्णवी वाघमारे उप मुख्याध्यापक उमेश सानप पर्यवेक्षक अंकिता डोके शिक्षक वृंद शिल्पा जेधे अनुष्का अडाने ,बनगे वंदना, परजणे प्रेरणा, परजने अमर , परजणे रोशन, भस्मा रे शिवराज, खरपाडे शिवम शिपाई आदित्य रकटे, उगले केतन यांनी आप आपली जिम्मेदारी योग्यरीत्या पार पाडली मुलांना मार्गदर्शन पर भाषण बागडे सर यांनी केले त्यानंतर आभार प्रदर्शन अंकिता डोके हिने केले. कार्यक्रम यशस्वी होण्याकरता शाळेचे मुख्याध्यापक सोनसळे सर व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले.

### आ.क्षीरसागर यांनी विधानसभा इच्छुकांसाठी अर्जाची तारीख वाढवली

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीत उमेदवारीसाठी इच्छुक असणाऱ्यांसाठी दि.५ सप्टेंबर ही अर्ज करण्याची अंतिम तारीख होती. परंतु आता इच्छुकांना अर्ज करण्यासाठी दि.१० सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी जिल्ह्यातील इच्छुकांनी मुदतीत अर्ज दाखल करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. बीड जिल्ह्यातून विधानसभा निवडणूक-२०२४ साठी इच्छुक उमेदवारांना अर्ज करण्याचे आवाहन बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून करण्यात आले होते. दि.५ सप्टेंबर २०२४ रोजी पर्यंत अर्ज करण्याची अंतिम तारीख होती. परंतु पक्षाच्या आदेशानुसार आता अर्ज करण्यासाठी मुदतवाढ मिळालेली आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून इच्छुक असलेल्या उमेदवारांना ही आणखी एक संधी उपलब्ध झाली आहे. दरम्यान दि.१० सप्टेंबर २०२४ पर्यंत बीड शहरातील राष्ट्रवादी भवन येथे दररोज सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत इच्छुक उमेदवारांना अर्ज दाखल करण्याची सुविधा उपलब्ध आहे. तरी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी मुदतीत अर्ज दाखल करण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

### बीडमध्ये रिपाइंची महत्वपूर्ण बैठक-अविनाश जोगदंड

बीड । प्रतिनिधी

रिपाईच्या महत्त्वपूर्ण बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे शहराध्यक्ष अविनाश जोगदंड यांनी केले आहे. तरी जिल्ह्यातील पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष, महिला आघाडी पदाधिकारी, शहर प्रमुख, युवा रिपाइंपदाधिकारी, सर्कल प्रमुख व क्रियाशील पदाधिकारी, कार्यकर्ते यांना कळविण्यात येते की, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी व महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार (दि.९) सप्टेंबर रोजी सकाळी ११:३० वाजता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड बीड येथे महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. रिपाइंच्या वतीने सोमवार (दि.९) सप्टेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथील महत्त्वपूर्ण बैठकीस रिपाइंचे जिल्हा पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष, महिला आघाडी पदाधिकारी, युवा रिपाइं पदाधिकारी, रिपाइं बीड शहर पदाधिकारी, सर्कल प्रमुख, क्रियाशील पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते यांनी रिपाइंच्या वतीने आयोजित महत्त्वपूर्ण बैठकीस वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन रिपाइंचे बीड शहराध्यक्ष अविनाश जोगदंड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## श्री सिद्धेश्वर महाविद्यालयास नॅक समितीकडून मानांकन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाची दिनांक २९ व ३० ऑगस्ट २०२४ रोजी नॅक समिती बेंगलोर यांच्याकडून प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष म्हणून प्रोफेसर पी.पी. अजयकुमार (कुलगुरू, यूनिवर्सिटी ऑफ केरला, तिरुअनंतपुरम) तसेच कॉर्डिनेटर म्हणून प्रोफेसर मोहन सिंग (इलाहाबाद विश्वविद्यालय इलाहाबाद ) व सदस्य म्हणून प्रोफेसर मुजफ्फर अहमद भट्ट (प्राचार्य, गव्हर्नमेंट डिग्री कॉलेज अनंतनाग जम्मूकश्मीर) या तीन सदस्यीय समितीने महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन महाविद्यालयातील विविध मंडळ व विभागांची पाहणी करून त्यांचा प्रत्यक्ष अहवाल नॅक ऑफिस बेंगलोर येथे सादर केला होता.





काल दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी प्राचार्यांना प्राप्त झालेल्या ई-मेलनुसार महाविद्यालयास बी ++ मानांकन प्राप्त झाले आहे. महाविद्यालयाच्या या मानांकनाबद्दल संस्थेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर, केंद्रीय कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, कार्यवाह ॲड. विश्वास जोशी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे, प्रकाश दुगड यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे , समन्वयक डॉ. विनायक देशमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे या मानांकनाबद्दल अभिनंदन केले आहे.

## २५१६१ बोगस मतदारांची नावासह यादी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सुपूर्द!



बीड । प्रतिनिधी

बीडमधील प्रस्थापित राजकारण्यांनी स्वतःच्या विजयाची समीकरणे जुळून आणण्याकरिता बोगस मतदारांची नावे मतदान यादीत लावून घेतली असून ही बोगस मतदारांच्या नावांची संख्या तब्बल २५१६१ एवढी मोठी असल्याचे समोर आले आहे. सर्व यादी तपासली असता २५१६१ मतदारांची नावे ग्रामीण आणि शहरी भागातील दोन्ही मतदान यादीत असल्याचे आढळून आले आहे. मतदान यादीत दोनदा नाव असल्याने ही मतदार दोन वेळा मतदानाचा हक्क बजावत आले आहेत.

लोकशाहीची गळचेपी करणाऱ्या या अत्यंत महत्वपूर्ण मुद्यावर शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी आवाज उठवला असून काल दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १.०० वाजताच्या दरम्यान २३०-बीड विधानसभा मतदार संघामध्ये असणाऱ्या २५१६१ दुबार नावांची यादी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे मा. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे आणि उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी बीड यांच्याकडे प्रत्येकी एक प्रत शिवसेना पदाधिकाऱ्यांनी सुपूर्द केली. याबरोबरच दुबार मतदारांच्या यादीबाबत तात्काळ योग्य ती कारवाई करून लोकशाहीची गळचेपी करणारा प्रस्थापितांचा हा अनधिकृत असलेला घाणेरडा डाव हाणून पाडावा असे आवाहन देखील जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी बीड यांना शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या वतीने निवेदन देण्याकरिता शिवसेना जिल्हा संघटक सुनील भाऊ सुरवसे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष भाऊ जाधव, शिवसेना उप-तालुकाप्रमुख भारतजी देवकते, शिवसेना उप-शहरप्रमुख हनुमानप्रसादजी पांडे, आकाश जगताप, प्रतिक कांबळे, सखाराम सातपुते यांच्यासह आदी उपस्थित होते.

### शिवसैनिकांची आता नजर तुमच्यावर- अनिल जगताप

बोगस मतदान करणाऱ्यास एक वर्ष सश्रम करावासाची शिक्षा आणि पाचशे रुपये दंड असून मतदान यादीत दोनदा नाव असणाऱ्यांची यादी नावासह प्रत्येक पोलिंग बूथवर जाहिरात फलकाची उभारणी करून प्रसिद्ध करण्यात येणार आहे. यामुळे विधानसभा निवडणुकी दरम्यान नेत्या पुढ्याचं बळ पाठीशी आहे म्हणून कुणीही दुबार मतदानाचा हक्क बजावू नये, शिवसैनिकांची आता करडी नजर प्रत्येक बूथवर बोगस मतदान करणाऱ्यांवर असणार आहे. दुबार मतदान करताना कुणी आढळून आल्यास शिवसेनेकडून त्यास त्याच ठिकाणी योग्य तो जाब देण्यात येईल असा आवाहनात्मक इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बोगस मतदान करणाऱ्यांना दिला आहे.

## डॉ. प्रकाश खेत्री यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

माजलगाव । प्रतिनिधी

शिक्षक दिना निमित्त नागरी विकास सेवाभावी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून दिला जाणारा राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार माजलगाव तालुक्यातील मोठीवाडी येथील रहिवासी डॉ.प्रकाश खेत्री यांना ज्येष्ठ विधीतज्ञ तथा जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. आनंदसिंग बायस यांच्या हस्ते तेजस्विनी इंग्रजी शाळा, पुंडलिकनगर येथे प्रदान करण्यात आला. यावेळी मा. श्री.मिलिंद पाटील, धर्मदाय कार्यालय, माजी सैनिक मा. श्री. नारायणराव भोसले, डॉ. गिताताई शोभवन, मा. श्री. चिमणरराव डुकरे, कार्यक्रमाचे मुख्य संयोजक मा. श्री. एल. डी. ताटू साहेब, अँड सुभाष कोकुल्डे, भोरासिंग राजपूत, प्रा. गुरूदत्त राजपूत, अंजली कोकुल्डे व प्रा. भिमसिंग काहटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



डॉ. खेत्री हे डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय,कन्नड येथे समाजशास्त्र विभागात गेल्या २० वर्षा पासून कार्यरत आहेत, तसेच ते कनिष्ठ महाविद्यालय समाजशास्त्र परिषदेचे राज्याध्यक्ष आहेत. ''विकास आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेत अजिंठा डोंगर परिसरातील भिल्ल जमात '' या विषयावर समाजशास्त्र विषयात संशोधन कार्य केले आहे. मासिके व दैनिकातून ते प्रासंगिक, परीक्षणात्मक आणि विश्लेषणात्मक लेख लिहितात. विविध विषयांवर त्यांचे संशोधन पेपर प्रकाशित झाले आहेत, कन्नड आणि परिसरात अनेक विषयावर त्यांनी शेकडो व्याख्याने दिली आहेत, अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातूनही त्यांनी प्रबोधन केले आहे, महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि संशोधन मंडळ,पुणे बालभारती येथे समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे ते सदस्य म्हणून कार्यरत आहेत. या सर्व शैक्षणिक,सामाजिक कार्य आणि योगदानाची दखल घेत. नागरी विकास सेवाभावी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांनी डॉ. प्रकाश खेत्री यांना राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार ,२०२४ देऊन सन्मान केला आहे. सन्मान व पुरस्कार मिळालाबद्दल डॉ.भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. ए. के.महाले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .विजय भोसले, उपप्राचार्य डॉ.बी.के. मगर उपप्राचार्य प्रा. अभय आहेर व मोठेवाडी येथील मित्र परिवार यांनी अभिनंदन केले आहे.

## परमेश्वर सातपुते यांनी केली अतिवृष्टीग्रस्त भागांची पाहणी

शिरूर । प्रतिनिधी

आज शिरूर तालुक्यातील अतीवृष्टी ग्रस्त भागांची पाहणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी केली,व शेतकऱ्यांना सरसकट प्रती हेक्टरी एक लाख रूपये मदत शासनाने तात्काळ जाहीर करावी व सरसकट कर्ज माफी करावी आशी मागणी केली.. बीड जिल्ह्यामध्ये गेल्या तीन-चार दिवसांपासून अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे अगदी शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास, कापूस असेल उडीद, सोयाबीन मक्का, बाजरी असे अनेक पिकांचे पावसामुळे पूर्णपणे नुकसान झालेले आहे. नदीकाठच्या जवळील जमिनी पुराच्या पाण्यामुळे वाहून गेलेल्या आहेत त्यासोबत शेतकऱ्यांनी अगदी लहान मुलाप्रमाणे सांभाळलेले पीक पूर्णपणे उध्वस्त होऊन गेलेले आहे, त्यामुळे शेतकरी राजा अत्यंत चिंताग्रस्त झालेला आहे कधी आसमानी संकट तर कधी सुलतानी संकट शेतकऱ्यांच्या वाटेला आलेले दुःख कधी कमी होणार,आजच्या परिस्थितीला शेतकऱ्यांच्या कापसावरती मर नावाचा रोग आल्याने उरले सूरले राहिलेले पीक सुद्धा या मर नावाच्या रोगाने होत्याचे नव्हते झाले आहे.



आज शिरूर भागातील अतिवृष्टी ग्रस्त भागाचा पाहणी दौरा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी केला त्यावेळी त्यांनी बोलताना असे म्हटले की ज्या ज्या वेळी या महाराष्ट्रातला शेतकरी संकटात येईल त्यावेळी या शेतकऱ्यांच्या पाठीशी शिवसेनेचे पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब व बीड जिल्हा शिवसेना संकट काळी शेतकऱ्यांच्या सोबत उभी राहील हा शब्द शेतकरी बांधवांना दिला. व नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट एक लाख रुपये प्रति हेक्टरी तात्काळ मदत जाहीर करावी असे या सरकारला मागणी केली व त्यासोबतच शेतकरी जगला पाहिजे व स्वाभिमानाने ताठ मानेने उभा राहिला पाहिजे म्हणून अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची संपुर्ण कर्जमाफी या सरकारने केली पाहिजे अशी मागणी यावेळी केली. याप्रसंगी माझ्यासह शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथजी खेडकर, तालुका प्रमुख सोपान काका मोरे, बाळासाहेब नागरे,अल्पसंख्याक सेलचे उपजिल्हाप्रमुख लाला भाई पठाण, बाळासाहेब खोले, युवासेनेचे तालुका प्रमुख साईनाथ ढाकणे, सोशल मीडिया तालुका प्रमुख वैभव जाधव, विनोद गूंड पाटील, दिपक घोडके पाटील, गणेश स्वामी सह सर्व उपस्थित होते.

## गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद निमित्त पाटोद्यात शांतता समितीची बैठक

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुका हा शांततेसाठी प्रसिध्द आहे .पाटोद्याचा हाच लौकिक कायम राखण्यासाठी तसेच सर्वधर्मीय सण येथे आनंदात व शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांचाच प्रयत्न असतो.शांततेची हीच ओळख कायम ठेऊन येणारे सण उत्साहात साजरे करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांनी केले.आगामी गणेशोत्सव व ईद ए मिलाद निमित्त पाटोदा पोलीस ठाण्याच्या प्रांगणात पोलीस दलाच्या आयोजित शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी मंचावर नायब तहसिलदार श्रीनिवास मुळे,नगरपंचायत कार्यालयीन अधिक्षक मस्के साहेब,पोलीस उपनिरीक्षक श्री. माधव काटकर नगराध्यक्षापती राजु जाधव,विद्युत महामंडळाचे श्री.आमोल मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार व पोलीस निरीक्षक श्री.अनमोल केदार यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली यावेळी गणेश मंडळाच्या समस्या तसेच श्रीच्या विसर्जनाच्या मार्गाचे दुरुस्ती आदींवर चर्चा करून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सुचना देण्यात आल्या ह्या सर्व अडचणी श्रीच्या आगमनापुर्वी सोडविण्यात येतील असे आश्वासन देण्यात आले यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक श्री.अनमोल केदार म्हणाले की सण आणि उत्सवासंदर्भात प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या सूचनांचे सर्वांनी गांभिर्याने पालन करणे गरजेचे आहे, प्रत्येक मंडळाने मंडप उभारतांना वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, वाहने सुरळीत वाहतूक करू शकतील याची दक्षता घ्यावी,डीजे न लावता पारंपरिक वाद्यांना प्रधान्य द्यावे,कायद्याचा पालन न करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. अश्या सुचना त्यांनी उपस्थितांना दिल्या.यावेळी विविध गावचे पोलिस पाटील तसेच शांतता समितीचे सदस्य,पत्रकार आणि गणेश मंडळाचे प्रतिनिधी,नागरिक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते .



जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/५७९
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०६/०८/२०२४

नाव बदलण्याचा

### जाहिरनामा

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) मनीषा सतीश जाधव रा.मसईतांडा नं. २ ता. अंबड जि. जालना प्रकरण सर्वे नं. ८१ सहान प्लॉट नं. ३४ न.प.मि.नं.१८-६०-३४/२ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-६०-३४/२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- याच प्लॉट नंबर ३४ मधील भाग
पश्चिम : सहान प्लॉट
दक्षिण- कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तर : पाण्याची टाकीचा कंपाऊंड वॉल

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

cmyk

राज्य लोकतंत्र

शनिवार दि.०७ सप्टेंबर २०२४


# लोकनेते मुंडे साहेबांनी जनतेसाठी पाहिलेली प्रत्येक स्वप्न सरकारी योजना बनवल्या केवळ इमारती बांधल्या नाहीत तर माणसाला माणूस जोडण्याचे काम आम्ही केले

### अहिल्यानगरच्या राहता पंचायत समितीच्या नवीन इमारतीचे आ. पंकजाताई मुंडेंच्या हस्ते थाटात उदघाटन; मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांसह अनेकांची उपस्थिती

शिर्डी । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी जनतेसाठी जी स्वप्न पाहिली होती, त्या स्वप्नांच्या मी मंत्री असताना सरकारी योजना तयार केल्या आणि त्यातून विकासाची कामे मार्गी लावली. आम्ही केवळ नवीन इमारती बांधल्या नाहीत तर शासकीय योजनांच्या माध्यमातून माणसाला माणूस जोडण्याचे काम केले, जनसेवेचे हा वसा कधीही सोडणार नाही असे प्रतिपादन भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी येथे केले.




सात कोटी रूपये खर्च करून बांधण्यात आलेल्या राहता पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्धाटन आज आ. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते मोठ्या थाटात पार पडले, त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे महसूल मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून आ. आशुतोष काळे, माजी खासदार डॉ. सुजय विखे, शालिनीताई विखे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. पंकजाताई म्हणाल्या, मुंडे साहेबाचा वारसा असल्याने मला समाजासाठी नेहमी चांगलच काम कराव लागत. साहेबांनी आयुष्यभर वंचित, पिडित समाजाची सेवा केली, या घटकांचा विकास व्हावा यासाठी त्यांनी काही स्वप्न पाहिली होती. त्यांच्या पश्चात मंत्री झाल्यावर मी त्यांची स्वप्न सरकारी योजना बनून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, प्रत्येक भागात ग्रामपंचायत कार्यालय, वाडी, वस्ती तांड्यावर मुलभूत सोयी अशी कितीतरी करोडो रूपयांची कामे केली. राज्यात ९८ पंचायत समित्यांना ४२९ कोटी खर्च करून नवीन इमारती दिल्या. महिलांसाठी साडे तीन लाख बचतगट तयार केले.

पान ३ वर

#### साहेबांच्या पश्चात तुमचे आशीर्वाद माझ्यासोबत

आज मुंडे साहेब नाहीत पण त्यांच्या पश्चात तुम्ही माझ्यावर तितकेच प्रेम करत आहात, साहेब नसले तरी आज करोडो लोकांचे आशीर्वाद सतत माझ्यासोबत आहेत आणि याच बळावर भविष्यात देखील वंचित, उपेक्षित घटकांची सेवा मी करत राहील असं अभिवचन आ. पंकजाताईंनी यावेळी दिलं. या कार्यक्रमात महिला बचत गट आणि विविध योजनेतील पात्र लाभार्थी महिलांना धनादेशाचे वाटप तसेच फूड प्रोसेसिंग युनिटचे वितरण त्यांच्या हस्ते करण्यात आले.

#### साईबाबांचे घेतले दर्शन

सकाळी ११.१५ वा. आ. पंकजाताई मुंडे यांचे खासगी विमानाने शिर्डी विमानतळावर आगमन झाले, याठिकाणी माजी खासदार डॉ. सुजय विखे व कार्यकर्त्यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. पंचायत समितीचा कार्यक्रम झाल्यानंतर आ. पंकजाताईंनी शिर्डीत जाऊन श्री साईबाबांचे दर्शन घेतले.

## गंगामसला मंडळात अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांची नुकसान पाहाणी

माजलगाव ( प्रतिनिधी ) तालुक्यातील गंगामसला मंडळात मागील चार दिवसात जोरदार पाऊस झाला आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकामध्ये पाणी साचुन जमीनी खरडल्या आहेत. शेतकऱ्यांचे सोयाबीन, कापुस,तुर,मुग पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. कापुस पिकाला आकस्मिक मर रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने हाताला आलेल्या पीकाचा धुरळा झाला आहे. यामुळे परिसरातील शेतकरी हवालदिल झाला आहे.



शेतकऱ्यांना दिलासा मिळावा या हेतुने शासनाचे प्रतिनिधी म्हणून कृषी सहाय्यक संदीप नलबले, तलाठी के.डी.सोळंके यांनी दि.५ सप्टेंबर गुरुवार रोजी तालुक्यातील मोठेवाडी, छोटेवाडी,रोषनपुरी, नागडगाव येथील नुकसानग्रस्त भागाची पहाणी केली व शेतकऱ्यांना धीर दिला, एकाचवेळी अनेक शेतकरी त्यांच्या

पान ३ वर

## मोठेवाडी येथील शेतकऱ्याचा मुलगा झाला आरोग्य सेवक

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील अशोक बबनराव राऊत यांची पुणे जिल्हा परिषद आरोग्य सेवक पदी निवड झाली आहे, अतिशय सर्वसामान्य घरातील शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी आरोग्य सेवक झाला, जिद्द चिकाटी मेहनत संघर्ष असेल तर अशक्य गोष्टी जीवनात शक्य करता येतात, त्याचे हे ज्वलंत उदाहरण आहे.



नुकत्याच शासनाने केलेल्या सरळ सेवा भरती प्रक्रियेतील आरोग्य सेवक पदासाठी ची पुणे जिल्ह्यातील परीक्षा अशोक राऊत यांनी दिली होती आणि त्यामध्ये ते यशस्वी झाले आहेत, त्यांच्या या निवडी बद्दल डॉ.भानुदास रासवे,संभाजी पास्टे, राहुल सुरवसे,अशोक रासवे,नितीन जाधव,आदित्य गोंडे,दशरथ खेत्री व मित्र परिवार यांनी अभिनंदन केले आहे.

## शिक्षकांच्या समस्या शासनाकडे प्रभावीपणे मांडण्यासाठी वज्रमूठ आवश्यक:माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख

माजलगाव । प्रतिनिधी

मोठ्या संघर्षातून शिक्षकांना मिळवून दिलेले हक्क व अधिकारांवर गदा आणली जात असून अनेक वर्षांपासून राज्यातील शिक्षक कर्मचाऱ्यांचे अनुदानापासून ते पेन्शन पर्यंत अनेक गंभीर प्रश्न निर्माण झालेत हे प्रश्न शासनदरबारी प्रभावीपणे मांडण्यासाठी शिक्षकांची एकत्रित वज्रमूठ आवश्यक असल्याचे प्रतिपादन मराठवाड्याचे माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख यांनी व्यक्त केले.



शिक्षक दिनानिमित्त नवविकास मंडळ आयोजित शिक्षक गौरव कार्यक्रमात श्री.देशमुख बोलत होते.माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व योगिता मोडक यांच्या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष एड.एस.आर.शर्मा व्यासपीठावर उपाध्यक्ष एड.आर.डी. भिलेगावकर,सहकार्यवाह आर.बी.देशमुख,संचालक संपादक शिरीष देशमुख यांची उपस्थिती होती.

## बीडमध्ये उत्कृष्ट देखावा सादर करणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळास लाखांचे बक्षीस

### कल्पतरू प्रतिष्ठानचा उपक्रम; नोंदणी करण्याचे डॉ.योगेश, डॉ.सारिका क्षीरसागर यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या कल्पतरू प्रतिष्ठानच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांनी नाव नोंदणी करण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिका क्षीरसागर यांनी केले आहे.

गणेश चतुर्थीनिमित्त सार्वजनिक गणेश मंडळ लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठी तयार असून गणरायाचे आगमन एका दिवसावर येऊन ठेपले आहे. यावर्षी कल्पतरू प्रतिष्ठानच्या पुढाकारातून आकर्षक देखावे साकारणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धेचे आयोजन केले आहे. पहिल्या क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळास १ लाख १ हजार, द्वितीय क्रमांकास ५१ हजार आणि तृतीय क्रमांकास ३१ हजार इतक्या रक्कमेचे पारितोषिक, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. दरम्यान, उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळांच्या देखाव्यांची निवड करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये प्रा.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, व्यंकटेश वैष्णव, प्रा.संजय पाटील देवळाणकर, प्रा.सारंग वाघमारे, फामजी पारीख, विद्याभूषण बेदरकर यांचा समावेश आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मंडळांनी नोंदणीसाठी श्रीमंत तोंडे ८३२९२५९२९५ व नागेश शेटे ७०५७०२६८७७ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.





## शिवाचार्य चंद्रशेखर महाराजांचे माजलगाव नगरीत भव्य स्वागत

### श्रावणमासात भीमाशंकर येथे केले होते तिसरे तपोअनुष्ठाण

बीड । प्रतिनिधी

वीरशैव समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या माजलगाव येथील मिस्कीनस्वामी मठाचे मठाधिपती शिवाचार्य चंद्रशेखर महाराज यांनी बारा ज्योर्तिलंगापैकी एक असलेल्या श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे श्रावणात महिनाभर तपोनुष्ठाण केले. तपोनुष्ठाणाची सांगता झाल्यानंतर ४ सप्टेंबर रोजी त्यांचे माजलगाव नगरीत उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी सायंकाळी ७ वाजता माजलगाव मठ परिसरात शिवाचार्य चंद्रशेखर महाराजांची मिरवणूक काढण्यात आली.

माजलगाव येथील मिस्कीनस्वामी मठाचे मठाधिपती प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्यानंतर उत्तराधिकारी म्हणून शिवाचार्य चंद्रशेखर महाराज यांची नियुक्ती करण्यात आली. शिवाचार्य चंद्रशेखर महाराज यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव मठात विविध धार्मिक कार्यक्रम घेतले जातात.उत्तराधिकारी झाल्यानंतर मठाधिपती शिवाचार्य चंद्रशेखर महाराज यांनी



श्रावणातील पहिले २०२२ मध्ये माजलगावकर मठातील प्रभूपंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या समाधीजवळ केले होते. दुसरे तपोनुष्ठाण श्रीक्षेत्र कपिलधार येथे तर यंदा श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे तिसरे तपोनुष्ठाण केले. या तपोनुष्ठाणाची सांगता झाल्यानंतर शिवाचार्य चंद्रशेखर महाराज यांनी श्रीक्षेत्र कपिलधार येथे संत शिरोमणी श्री मन्मथ स्वामी यांच्या संजिवन समाधीची महाआरती केली. माजलगावकर मठाच्या वतीने सुरु असलेल्या अन्नदानाचे उद्यापन केले. यानंतर सायंकाळी ७ वाजता त्यांचे माजलगाव नगरीत आगमन झाल्यानंतर भक्तांच्या वतीने त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. माजलगावकर मठ परिसरात शिवाचार्य चंद्रशेखर महाराजांची मिरवणूक काढण्यात आली. मठात आगमन झाल्यानंतर श्री मिस्कीनस्वामी आिण प्रभूपंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या समाधीची महाआरती करुन दर्शन घेतले. यानंतर त्यांनी उपस्थित भाविकांना धर्मोपदेश केला.

## बापू शिंदे यांची बीड भारत स्काऊट आणि गाईडच्या जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काउट पदी नियुक्ती

म्हसोबावाडी। प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टा हरिनारायण शाळेवर कार्यरत असलेले उपक्रमशील आदर्श शिक्षक व स्काऊट मास्टर बापू बाबा शिंदे यांची महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड राज्य कार्यालय मुंबई यांच्याकडून बीड भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा कार्यालयात जिल्हा प्रशिक्षण आयुक्त (स्काऊट) पदी नूकतीच नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचा




बीड येथील भारत स्काउट आणि गाईड जिल्हा कार्यालयात जिल्हा कार्यकारी मंडळाच्या बैठकीत दि ५ सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हा संघटक योगेश आवढाळ,जिल्हा मुख्य आयुक्त तथा शिक्षणाधिकारी प्राथमिक भगवान फुलारे,जिल्हा आयुक्त स्काऊट तथा माध्यमिक शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे,जिल्हा चिटणीस रंगनाथ राऊत,जिल्हा मुख्यालय आयुक्त स्काऊट

पान ३ वर

## रविवार १४ वर्षाखालील क्रिकेट संघासाठी निवड चाचणी

बीड । प्रतिनिधी

पावसामुळे मागच्या रविवारी पुढे ढकलण्यात आलेली बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या १४ वर्ष वयोगटातील संघ निवडीसाठी रविवार दिनांक ०८/०९/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वाजता बीड येथील मल्टीपर्पज मैदानावर निवड चाचणी आयोजित केली आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन च्या १४ वर्षाखालील वयोगटातील निमंत्रितांच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बीड जिल्हा संघ निवडीसाठी ही चाचणी होत असून पात्र खेळाडूंनी (कट ऑफ डेट ०१/०९/२०१० )पूर्ण गणवेशात आधार कार्ड, जन्मप्रमाणपत्राच्या दाखला व प्रवेश शुल्कासह वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ भारत भूषण क्षीरसागर, डॉ योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम, महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखूदे, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख यांनी केलेआहे.

## अंबाजोगाईत संत शिरोमणी सेना महाराजांच्या विचारांचा जागर - राजकिशोर मोदी

### अंबाजोगाईत श्री संत शिरोमणी सेना महाराज यांची पुण्यतिथी साजरी

अंबाजोगाई प्रतिनिधी

श्री संत शिरोमणी सेना महाराज यांच्या ६२५ व्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पुण्यतिथी सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी श्री.संत सेना महाराज प्रतिष्ठाण आणि नाभिक समाज, अंबाजोगाई यांनी पुढाकार घेतला होता.

शहरातील श्री संत सेना महाराज व श्री संत नरहरी महाराज मंदिर, मुकुंदराज रोड, अंबाजोगाई येथे शुक्रवार, दिनांक ३० ऑगस्ट रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत श्रीहरी गवळी, माणिकराव राऊत, विष्णु कचरे आणि पांडुरंग कचरे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापुजा करण्यात आली. त्यानंतर सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प.जनार्धन महाराज चलवाड (श्री.जगद्गुरू तुकोबाराय पावनधाम, औरंगपुर) यांची किर्तन सेवा संपन्न झाली. तर दुपारी १२ ते २ या वेळेत प्रसिद्ध गायक सुभाष शेप व गायक रफिक भाईजान, मयुरी यांचा भक्तीगीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते किर्तन व भजनाचे मानकरी विठ्ठल शिंदे, महाप्रसादासाठी योगदान देणारे माणिकराव राऊत यांचा तसेच विविध प्रसंगी समाजोपयोगी उपक्रमास सहकार्य करणारे अजिंक्य राऊत, श्रीहरी गवळी, विष्णू कचरे, पांडुरंग कचरे, भिमराव कचरे यांचा ही कृतज्ञताभाव व्यक्त करीत सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरूवातीला मान्यवरांनी श्री संत सेना महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर प्रमुख अतिथी राजकिशोर मोदी, सोनार समाजाचे अध्यक्ष राजेश पंडित यांचे नाभिक एकता महासंघाचे तालुकाध्यक्ष तथा संत सेना महाराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष मधुकर सुरवसे, नाभिक एकता कर्मचारी महासंघ तालुकाध्यक्ष डॉ.केशव राऊत, माणिकराव हरणे, अनंत मोहिते, विष्णू कचरे व इतरांनी स्वागत केले. यावेळी उपस्थित समाज बांधवांना मार्गदर्शन करताना माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, दरवर्षी हा पुण्यतिथी सोहळा आयोजित करण्यात येतो. या कार्यक्रमाच्या निमित्ताने संपूर्ण समाज एकत्र येतो. या ठिकाणी आपण सर्वजण भक्तीपर भजन, कीर्तनाच्या माध्यमातून श्री संत शिरोमणी सेना महाराजांच्या विचारांना उजाळा देण्याचे काम करतो. या माध्यमातून नाभिक एकता महासंघाचे तालुकाध्यक्ष मधुकर सुरवसे व त्यांचे सहकारी हे




पान ३ वर

## गणेशोत्सव शांततेत पारा पाडा, सामाजिक सलोखा राखा सहाय्यक पोलीस निरीक्षक धोकरट व उपनिरीक्षक कुलकर्णी

मानूर प्रतिनिधी

गणेशोत्सव आता तोंडावर आला असून गणपती मंडळांकडून जय्यत तयारी सुरू असताना पोलिसांकडून आयोजित शांतता बैठकीत बुधवारी श्रीगणेश स्थापना ते विसर्जनापर्यंतची नियमावली जारी करून गणपतीचा आनंद तुम्ही घ्या आणि दुसऱ्यांना देखील घेऊ द्या, असे आवाहन करण्यात आले.

सहायक पोलिस निरीक्षक गणेश धोकरट व पो.उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी तसेच पोलिस कॉन्स्टेबल राज ससाणे यांनी उपस्थित गणेशभक्तांना मार्गदर्शन केले. त्यात गणपतीच्या मूर्तीची सुरक्षा व पावित्र्य सांभाळा, मंडळात बावन्न पानी पोथी लावू नका त्यापेक्षा वाचनीय पुस्तके, धर्मग्रंथ ठेवा, लाइटची रीतसर परवानगी घ्या, मंडळाने चोवीस तास स्वयंसेवक ठेवावेत, मद्यपानाला थारा देऊ नका, सामाजिक उपक्रम साजरे करा, धार्मिक वा जातीय तेढ निर्माण होईल असा कुठलाही देखावा अथवा अन्य प्रयोग करू नका, राजकीय,सामाजिक, धार्मिक महापुरुषांची हेळसांड होईल असे कोणतेही कृत्य करू नका, शालेय विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यासाठी विविध स्पर्धा आयोजित करा, सामाजिक सलोखा अबाधित ठेवा, सीसीटीव्ही बसवा, आग नियंत्रण उपाययोजना आदी महत्त्वपूर्ण मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या. नियमावली आम्ही सांगितली तुम्ही नियमावलीचे पालन करा, असे आवाहन यावेळी पोलिस अधिकारी धोक्ररट साहेब , कुलकर्णी साहेब राज ससाणे यांनी केले. बहुतांश गणेश मंडळाचे प्रतिनीधी यावेळी उपस्थित होते. आभार पत्रकार गोकुळ पवार यांनी मानले.



डीजे लावल्यास कारवाई

विसर्जन काळात पारंपरिक वाद्याला प्रधान्य द्या डीजे

पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेत बारामतीतील कान्हाटी ग्रामपंचायत राज्यात पहिली ; एक कोटींचे पारितोषिक मिळणार

**बारामती । प्रतिनिधी**

भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेमध्ये सन २०२२-२०२३ या कालावधीसाठी राज्यातून प्रथम क्रमांकाचा एक कोटी रुपयांचा तसेच जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचा पन्नास लाख रुपयांचा पुरस्कार बारामती तालुक्यातील का-हाटी ग्रामपंचायतीस जाहीर झाला आहे.

जिल्हास्तरीय पुरस्कारांतर्गत कान्हाटी ग्रामपंचायतीला प्रथम, पुरंदर तालुक्यातील सोनोरी ग्रामपंचायतीला ३० लाख रुपयांचा द्वितीय आणि चांबळी ग्रामपंचायतीला २० लाख रुपयांचा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार झाला झाला आहे.

अटल भूजल योजना, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्यावतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. पुणे जिल्हा प्रशासन आणि संबंधित तालुक्यांच्या प्रशासनाने केलेल्या कामाची दखल राज्यपातळीवर घेण्यात आली आहे.



भूजलाच्या अनियंत्रित उपशामुळे भूजल पातळीत होत असलेली घसरण व बाधित होत असलेली गुणवत्ता थांबवण्याकरीता मागणी व पुरवठा व्यवस्थापन प्रणालीच्या प्रभावी अमंलबजावणीद्वारे सहभागीय भूजल व्यवस्थापन अधिकाधिक सशक्त करण्यासाठी केंद्र शासन व जागतिक बँक अर्थसहाय्यित अटल भूजल योजना राबविण्यात येत आहे. लोकसहभागातून भूजल व्यवस्थापन करणे हा योजनेचा गाभा आहे. त्याकरीता ग्रामस्तरावर जलअंदाजपत्रक तयार करणे, भूजल उपलब्धतेतील तूट भरुन काढण्यासाठी अस्तित्वातील राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांचे अधिकाधिक अभिसरण करणे व ग्रामस्तरावरील भूजल उपलब्धतेत शाश्वतता साध्य करणे, हे योजनेचे उद्दिष्ट आहे.

अटल भूजल योजनेच्या अंमलबजावणीमध्ये योजनेत समाविष्ट ग्रामपंचायतीमधील अधिकाधिक लोकांनी सहभागी व्हावे; सर्वांनी गावातील भूजल व्यवस्था शाश्वत राखण्याकरीता मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा हे योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने गावा-गावांमध्ये सुदृढ स्पर्धा निर्माण व्हावी व योजनेचे मुख्य उद्दीष्ट 'लोकसहभागातून भूजल व्यवस्थापन' साध्य होण्यासाठी अटल भूजल योजनेंतर्गत भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली उपविभागीय समिती, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती आणि राज्यस्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली स्पर्धेचे मूल्यांकन करण्यात आले आहे.

# पोर्शे कार अपघातप्रकरणी मोठी अपडेट ; आमदारा पोलिसांनी केली चौकशी

**पुणे । प्रतिनिधी**

कल्याणीनगरधील हायप्रोफाईल अपघातप्रकरणात बिल्डर विशाल अगरवाल यांच्या मुलाला वाचविण्यासाठी तसेच त्यांना मदत करण्यासाठी अनेकांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मदत केली, अशा सर्वांची चौकशी केली आहे. याप्रकरणी वादात अडकलेले राष्ट्रवादीचे काँग्रेसचे (अजित पवार गट) आमदार सुनील टिंगरे यांच्या सहभागावरून तसेच त्यांच्या चौकशीवरून प्रश्न चिन्ह उपस्थित केले जात होते. परंतु, पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी चौकशी केल्याचे सांगितले.

पोलीस आयुक्त अमितेशकुमार गणेशोत्सवानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत असताना त्यांना प्रश्न विचारला असता त्यांनी ही माहिती दिली. कल्याणीनगर भागात मद्यपिऊन गाडी चालवत अल्पवयीन मुलाने आलिशान कारने दिलेल्या धडकेत दोन आयटी इंजिनिअर तरुण-तरुणीचा मृत्यू झाला. याअपघात प्रकरणात मुलाला ताब्यात घेतले. पंरुत, त्याला वाचविण्यासाठी प्रयत्न झाले. तसेच, या प्रकरणात बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवाल यांना मदत करण्यासाठी अनेकांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे मदत केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील टिंगरे हे पोलीस ठाण्यात गेले होते. त्यांनी दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप झाला होता.

दरम्यान, या अपघात प्रकरणात पोलिसांच्या कार्यपद्धती तसेच तपासाबाबत काहींनी शंका उपस्थित केली होती. सोशल मिडीयावर पुणे पोलीस यांच्यावर टीका झाली. मात्र, पोलिसांनी तपासात हलगर्जी केली नाही. अपघात प्रकरणात दोषी असलेल्या प्रत्येकावर कारवाई केली. अपघातानंतर आमदार सुनील टिंगरे



येरवडा पोलीस ठाण्यात गेले होते. त्यांचीही या प्रकरणात चौकशी झाली, असे आयुक्तांनी सांगितले. सखोल तपास केला. सर्व शक्यता गृहित धरून तपास केल्याने रक्तबदल आणि त्यातील सहभाग असलेल्या दोन डॉक्टर, आई यांच्यासह इतरांना अटक झाली. पोलिसांनी परिस्थितीजन्य तसेच तांत्रिक पुरावे गोळा केले. त्यामुळे साडेतीन महिन्यानंतर देखील या अपघात प्रकरणातील आरोपींना जामीन झाला नाही. यावरुन पोलिसांनी तपास योग्यरित्या केल्याचे सिद्ध झाले आहे, असेही आयुक्तांनी म्हंटले आहे.

# धक्कादायक। आंदगाव येथील शाळेत १९ विद्यार्थिनींचा विनयभंग

**पौड । प्रतिनिधी**

आंदगाव (ता. मुळशी) येथील शाळेत तब्बल १९ अल्पवयीन विद्यार्थिनींचा विनयभंग (झींपिश चेश्रशी-ींरींळेप उरीश) केल्याचा प्रकार समोर आला आहे. शाळेतील शिक्षकानेच या मुलींचा विनयभंग केल्याचे समोर आले असून उपशिक्षक जालिंदर नामदेव कांबळे (रा. लोणी काळभोर) याच्यावर पौड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पौड पोलिसांनी लोणी काळभोर येथून शिक्षकाला अटक केलेली असून शुक्रवारी (दि. ६) त्याला न्यायालयात हजर केले जाणार आहे.

आंदगाव येथे शाळेतील उपशिक्षक जालिंदर नामदेव कांबळे हा विद्यार्थिनींना शारीरिक मारहाण व शिकवताना अश्लिल भाषेत बोलतो. तसेच शारीरिक लगट करण्याचा प्रयत्न करतो, अशी माहिती शाळा व्यवस्थापनाला मिळाली. त्यानुसार गुरुवारी (दि. ५) संस्थेच्या कार्यकरणी समितीमधील सदस्य शाळेत चौकशीसाठी गेले. त्यावेळी १९ विद्यार्थिनींनी सदस्यांना संबंधित शिक्षकाविषयी लेखी अर्ज दिले. शाळेकडून देण्यात आलेल्या तक्रारीनुसार, जालिंदर कांबळे याने शाळेत खेळणाऱ्या एका मुलीच्या डोळ्याला पट्टी बांधत तिला मिठी मारली. त्यावेळी इतर विद्यार्थी ओरडल्याने त्याने तिला सोडले. कांबळे हा वर्गामध्ये विनाकारण विद्यार्थिनींच्या अत्यंत जवळ जाऊन कानामध्ये बोलायचा व मोठ्याने कानात ओरडायचा, तसेच हाताला स्पर्श करून डोक्यावर डोके आपटत असे. त्यास विरोध केल्यास मुलींना मारहाण करायचा. कांबळे हा शिकवताना विनाकारण फळ्यावर अश्लील शब्द लिहायचा. शाळेतील विद्यार्थिनींना लज्जा उत्पन्न होते, अशा स्वरूपाच्या तक्रारी केलेल्या आहेत.

ही कमगिरी पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनीलकुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी, संतोष जाधव, सहाय्यक पोलिस निरीक्षक बालाजी कांबळे, पोलीस उपनिरीक्षक योगेश जाधव, पोलीस उपनिरीक्षक शीतल ठेंबे, पोलीस हवालदार रॉकी देवकाते, संतोष कालेकर, सिद्धेश पाटील, पोलिस नाईक दत्तात्रय अर्जुन, अनिकेत सोनवणे, रेश्मा साठे, चालक अमोल सूर्यवंशी यांच्या पथकाने केलेली आहे. गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक योगेश जाधव हे करीत आहेत.

# गणेशोत्सवात पुण्यात चोख बंदोबस्त ; साडे पाच हजार पोलीस असणार तैनात

पुणे । प्रतिनिधी

वैभवशाली गणेशोत्सवा निमित्ताने शहरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात असणार असून, तब्बल साडे पाच हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात असणार आहे. शहराच्या मध्यभागाला केंद्रबिंदू मानत बंदोबस्त ठेवला असून, पुढील १० दिवस २४ तास पोलीस रस्त्यांवर तैनात राहून पुणेकरांची सुरक्षा, त्यांना सुविधा देऊन होणारी गैरसोय टाळणार आहेत.

वैभवशाली गणेशोत्सवानिमित्ताने शहरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात असणार असून, तब्बल साडे पाच हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात असणार आहे. शहराच्या मध्यभागाला केंद्रबिंदू मानत





बंदोबस्त ठेवला असून, पुढील १० दिवस २४ तास पोलीस रस्त्यांवर तैनात राहून पुणेकरांची सुरक्षा, त्यांना सुविधा देऊन होणारी गैरसोय टाळणार आहेत. यासोबत वाहतूक शाखेचे पोलीस कोंडी टाळण्यासाठी तैनात असतील. त्यांचा स्वतंत्र बंदोबस्त असणार आहे.

पुणे पोलिसांनी गणेशोत्सवानिमित्त जोरदार तयारी केली असून, महत्वाचा भाग तसेच तेथील गणेश मंडळांना भेट देऊन पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी नुकताच पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. त्यासोबत पुर्ण शहराचा आढावा घेत पुढील दहा दिवसांचे नियोजन केले आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष शाखेचे उपायुक्त जी. श्रीधर यांनी या बंदोबस्ताची आखणी केली आहे.

गणेशोत्सवाला शनिवारी (७ सप्टेंबर) सुरूवात होत आहे. उत्सवाच्या काळात संभाव्य घातपाती कारवाया तसेच अनुचित घटनांचा धोका विचारात घेऊन पोलिसांनी शहर तसेच उपनगरात कडेकोट बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. गर्दी तसेच वाहतूकीचे नियोजन आणि चोऱ्या रोखण्याच्या दृष्टीने देखील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

साडे पाच हजार पोलिसांसोबत होमगार्ड, शीघ्र कृती दल, गुन्हे शाखेची पथके, गृहरक्षक दलाचे जवान, केंद्रीय सुरक्षा दलाच्या तुकड्या तैनात असणार आहेत. तर पोलीस मित्रांचीही मदत घेतली जाणार आहे. मानाच्या मंडळांसह गर्दीच्या ठिकाणी बॉम्ब शोधक पथक व डॉग स्कॉड २४ तास उपलब्ध असणार आहेत. त्यांच्याकडून सातत्याने तपासणी केली जाणार आहे. यासोबतच गुन्हे शाखा व साध्या गणवेशातील पोलिसांकडून मध्यभागात दिवसातून ४ वेळा तपासणी केली जाणार आहे. शहरात लावलेल्या तब्बल १३५६ सीसीटीव्ही आणि इतर खासगी कॅमेऱ्यांद्वारे नजर ठेवली जाणार आहे. तर मंडळांनाही परिसरात सीसीटीव्ही बसविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

# पुणे जिल्हा पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांच्या बदलीस कॅटकडून स्थगिती

पुणे जिल्हा पोलिस अधीक्षक म्हणून कार्यरत असलेल्या पंकज देशमुख यांच्या बदलीस कॅटने (सेंट्रल अँडमिनिस्ट्रेटीव्ह ट्रायब्युनल) स्थगिती दिली आहे.



राज्याच्या गृहविभागाने राज्यातील वरिष्ठ अधिका-यांच्या कालच बदल्या केल्या होत्या. त्यात पंकज देशमुख यांची बृहन्मुंबईत उपायुक्तपदी बदली करण्यात आली होती. या बदलीविरुध्द पंकज देशमुख यांनी कॅटमध्ये दाद मागितली होती. या संदर्भात कॅटने निर्णय देताना ही बदली पुढील आदेश देईपर्यंत स्थगित ठेवण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले आहेत. या संदर्भातील पुढील सुनावणी १९ ऑक्टोबर रोजी होणार आहे. राज्यातील पोलिस कायदयानुसार पंकज देशमुख यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक पदावर कार्यरत होऊन सात महिन्यांचाच कालावधी झाला असताना अचानकच कोणतेही कारण न देता बदली केल्याचे त्यांनी कॅटपुढे नमूद केल्यानंतर कॅटने या बदलीस स्थगिती दिली आहे.

# युगेंद्र पवार आले ॲक्शनमोडमध्ये ; बारामतीमध्ये महिलांच्या नोकरीच्या संधींबाबत दिले आश्वासन

**बारामती । प्रतिनिधी**

राज्यामध्ये लवकरच विधानसभा निवडणूकांचा बिगुल वाजणार आहे. त्यापूर्वी सर्व नेत्यांचे दौरे आणि बैठका वाढल्या आहेत. बारामतीमध्ये शरद पवार गटाकडून युगेंद्र पवार यांच्या नावाची जोरदार चर्चा आहे. त्यामुळे बारामतीला नवीन 'दादा' मिळणार असल्याचे बोलले जात आहे. महिला शहराध्यक्षांनी आयोजित केलेल्या रक्षाबंधन कार्यक्रमाला उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी शरद पवार यांनी महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या लोकोपयोगी कामांचा उल्लेख केले. तसेच आणखी विविध व्यवसाय सुरू करण्यासाठी आपण प्रयत्न करू, असे आश्वासन देखील युवा नेते युगेंद्र पवार यांनी दिले.

कार्यक्रमामध्ये युगेंद्र पवार यांना महिलांनी औक्षण करुन राख्या बांधल्या. यावेळी युगेंद्र पवार यांच्या



मार्फत बारामती शहरातील सुमारे दोन हजार महिलांचा साडी देऊन सन्मान करण्यात आला. युगेंद्र पवार म्हणाले, महिलांना सक्षम करण्यासाठी पक्षातर्फे अधिक ताकदीने प्रयत्न केले जातील. महिलांना काम धंदा व व्यवसाय सुरू करण्यासाठी विविध संस्थांचे आपण मार्गदर्शन घेऊ. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी महिला सक्षमीकरणासाठी अनेक ध्येय धोरणे आखली आहेत. पवार साहेबांनी बारामतीमध्ये एमआयडीसी आणून विविध व्यावसायिक कंपन्या बारामतीमध्ये आणल्या आहेत. त्यामध्ये महिलांना समान संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आपण महिलांचे नोकरीचे प्रश्न नक्कीच मार्गी लावू, असे मत युगेंद्र पवार यांन व्यक्त केले.

मागील महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणूकीमध्ये बारामती मतदारसंघाची चर्चा देशभर रंगली होती. बारामतीमध्ये लोकसभा निवडणूकीवेळी पवार कुटुंबातील दोन्ही उमेदवार होते. अजित पवार गटाकडून सुनेत्रा पवार तर शरद पवार गटाकडून सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देण्यात आली होती. यामध्ये मोठा संघर्ष आणि राजकीय टोलेबाजी करण्यात आली. लोकसभेची निवडणूक गाजवत सुप्रिया सुळे विजयी झाल्या. त्यानंतर आता राज्यामध्ये लवकरच विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यामुळे बारामतीमध्ये विधानसभा रंगणार आहे. शरद पवार गटाकडून युगेंद्र पवार यांच्या नावाची चर्चा आहे. त्यामुळे विधानसभेला देखील पवार विरुद्ध पवार अशी लढत होण्याची शक्यता आहे.

# गुंजवणी जलवाहिनी होणार मूळ आराखड्यानुसार?

**पुणे । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या आदेशानुसार अखेर जलसंपदा विभागाने मूळ आराखड्यानुसार गुंजवणी जलवाहिनीचे प्रत्यक्ष सर्वेक्षण केले. बुधवारी (दि. ४) सकाळी परिंचे गावाच्या वाड्या वस्त्यांपासून सुरू झालेले हे सर्वेक्षण माहूर, हरणी, वाल्हे व वाल्हे गावच्या सर्व वाड्यावस्त्या करीत राख पर्यंत गेले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २४ जुलै रोजी शिवतारेंसह त्यांच्या मागणीनुसार सह्याद्री अतिथिगृह येथे राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव, उपसचिव व कृष्णा खोरे महामंडळाचे कार्यकारी संचालक आदींची गुंजवणीबाबत बैठक घेतली होती. त्यात मूळ सर्वेक्षणनुसार माहूर, परिंचे, हरणी, वाल्हे व राख या गावांच्या उत्तर दिशेने जलवाहिनी करण्याचे आदेश दिले होते. त्यासाठी स्वतः माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी जलसंपदा विभागासह लार्सन अॅन्ड टुब्रो कंपनीच्या अधिकार्यांना सोबत घेत रानोमाळ फिरून जलवाहिनीची दिशा दर्शवली. यावेळी कार्यकारी अभियंता स्वप्नील कोडूलकर, उपअभियंता नयन गिरमे, शाखा अभियंता गणेश टोलमारे, लार्सन अॅन्ड टुब्रो कंपनीचे रामराजू पुसापती, प्रसाद बारस्कर हे अधिकारी उपस्थित होते. स्थानिक गावांमधील दिलीप यादव, शालिनी पवार, फत्तेसिंग पवार, बाजार समिती सभापती शरद जगताप, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष उल्हास जाधव, समीर जाधव, काका राऊत, सागर करवंदे, अर्चना राऊत, सुशीलकुमार जाधव, बाळासाहेब मुळीक, हरणी येथील सरपंच धनंजय यादव, नितीन यादव, सागर भुजबळ, बाळासाहेब राऊत, महेंद्र पवार, उषा पवार, राहुल यादव, भाऊसाहेब भोसले, हरिभाऊ पवार, अमित पवार, मदन भुजबळ, कांतीलाल भुजबळ, सुहास खवले, प्रशांत पवार, रोहित भोसले, रत्नाकर रणनवरे, मनोज रणनवरे, राहुल रणनवरे इत्यादी उपस्थित होते.

# मी कधीही थांबणार नाही, मी कोणासमोर कधी झुकणार नाही...'; पंकजा मुंडे यांचे आवाहन

**वाघोली । प्रतिनिधी**

'मी कधीही थांबणार नाही, मी कोणासमोर कधी झुकणार नाही. काम करत राहील. तुम्ही असेच प्रेम करत रहा'. असे आवाहन भाजपच्या माजी मंत्री व आमदार पंकजा मुंडे यांनी वाघोली येथे केले. भारतीय जनता पक्षाच्या विधानसभा प्रवास योजनेअंतर्गत शिरूर हवेली विधानसभा पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत पंकज मुंडे यांनी मार्गदर्शन केले.

भाजप युवा मोर्चाचे वाघोलीतील जनसेवा कार्यालयाचे उद्घाटन मुंडे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी त्या बोलत होत्या. मुंडे यांनी पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीसंदर्भात सूचना ऐकूण घेत मार्गदर्शन केले. यावेळी भाजपचे याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद, पुणे





जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष शरद बुट्टे पाटील, राहूल पाचर्णे, जयश्री पलांडे, माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ दाभाडे, गणेश कुटे, अनिल सातव पाटील, दत्तात्रय हरगुडे, विजय जाचक, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी माजी मंत्री पंकजा मुंडे यांनी नागरिकांना आपल्यावर दाखवलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. वाघोलीत भाजपच्या विविध मंत्रिमंडळातील नेतेमंडळींना आणून दमदार कार्यक्रम करणाऱ्या संदीप सातव यांचे पंकजा मुंडे यांच्याकडून कौतुक करण्यात आले.

जनसेवा अविरतपणे चालू ठेवणे बाबतचा सल्ला देखील मुंडे यांनी सातव यांना दिला. पंकजा मुंडे जनसेवा कार्यालयाच्या उद्घाटनासाठी दाखल झाल्यानंतर त्यांच्यासोबत फोटो घेण्यासाठी तसेच त्यांना भेटवस्तू, पुष्पगुच्छ देण्यासाठी नागरिकांनी त्यांच्याभोवती एकच गर्दी केली होती.

# येरवडा ते शिरुर सहा पदरी उड्डाणपूलास मान्यता

पुणे - नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार येरवडा ते शिरुर हा ५३ कि.मी. दरम्यान सहा पदरी उड्डाणपूल उभारण्यास शासनाने मान्यता दिली आहे. उड्डाणपूल उभारण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत केले जाणार आहे. त्यास ७ हजार ५१५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. सध्याच्या पुणे-शिरुर-अहमदनगर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. नगर रस्त्यांवरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी येरवडा ते शिरुर हा रस्ता सहापदरी करण्यासंबंधीचा प्रस्ताव सादर करावा' असे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना मध्यंतरी दिले होते.

नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर आहे. त्यामधील महापालिकेच्या हद्दीतील येरवडा ते खराडी पुणे महापालिकेच्या हद्दीत येतो.

नगर रस्ता हा राज्य मार्ग असल्याने राज्य शासनाने पिंपरी-चिंचवड शहरातून जाणाऱ्या सिग्नल फ्री जुन्या पुणे-मुंबई रस्त्याच्या धर्तीवर हा रस्ता विकसित करण्यात यावा आणि त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी होत होती.

येरवडा ते शिक्रापूर हा रस्ता सहापदरी करण्याबरोबर कोणत्या ठिकाणी उड्डाणपूल आणि ग्रेड सेपरेटर करायचे, यासंबंधीचा आराखडा करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या होत्या. त्यानुसार यासाठीचा सविस्तर प्रस्ताव तयार करून मान्यतेसाठी शासनाकडे पाठविला होता. त्यास गुरुवारी मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

# हॉटेल चालकावर तलवारीने वार करत रोकड लुटली; पुण्यातील धक्कादायक प्रकार

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात गुन्हेगारांनी हैदोस घातला असताना येरवड्यात जुन्या वादातून एका चायनीज हॉटेल चालकावर तलवारीने हल्ला करण्यात आला. तर, जबरदस्तीने हॉटेलच्या गल्ल्यातील रोख रक्कम लांबवल्याचा घटना घडली आहे. याघटनेत हॉटेल चालक गंभीर जखमी झाले आहेत. असिम जावेद सय्यद असे हल्लात जखमी झालेल्या चालकाचे नाव आहेत.



याप्रकरणी जावेद अहमद सय्यद (वय ५६, रा. गोल्फ क्लब रोड, येरवडा) यांनी येरवडा पोलिसांत तक्रार दिली आहे. त्यानुसार मोबीन शेख व त्याच्या साथीदाराविरोधात गुन्हा दाखल केला आहे. येरवडा इराणी मार्केट जवळ पक्को चायनीज हॉटेल येथे हा प्रकार घडला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, जावेद सय्यद आणि ओरीपी यांच्यात रमझान महिण्यात वाद झाला होता. याचा राग आरोपींच्या मनात होता. दरम्यान, मोबीने सोमवारी रात्री साडेआठच्या सुमारास जावेद यांचा मुलगा असिम हा हॉटेलमध्ये असताना आला. त्याने असिमवर तलवारीने वार केला. यात असिमच्या डाव्या हाताच्या बोटांना गंभीर दुखापत झाली. नंतर दोघा आरोपींनी गल्ल्यातील ६ ते ७ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेत पळ काढला. यानंतर देखील या आरोपींनी फोनद्वारे शिवीगाळ करत जावेद यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पुढील तपास सहायक निरीक्षक खेडकर करत आहेत.

पुण्यात गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पुण्यातील नाना पेठेत रविवारी रात्री घडलेल्या हत्याकांडाने एकच खळबळ माजली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची भररस्त्यात गोळ्या घालून आणि कोयत्याने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली. ५-६ बाईक्सवरून आलेल्या हल्लेखोरांनी वनराज यांच्यावर धडाधड गोळ्या झाडल्या.एवढेच नव्हे तर ते खाली कोसळल्यावर त्यांच्यावर कोयत्यानेही वार करण्यात आले. हल्ल्यानंतर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आंदेकरांना लगेचच रुग्णालयात नेण्यात आले मात्र तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पुण्यासारख्या शहरात,रात्री, वर्दळीच्या जागी भररस्त्यात असा गुन्हा घडतो, कायद्याची कोणतीही भीती न बाळगता हल्लेखोर एकाचा थेट जीव घेतात या घटनेने प्रचंड खळबळ माजली असून शहरात दहशतीचं वातावरण आहे.